**इतिहास म्हणजे काय?**

कशासाठी इतिहासाचा अभ्यास करायचा? गढे मुडदे उकरून काय मिळणार? आता वास्तवात इतके प्रश्न आहेत ते सुटता सुटत नाही तिथे परत हे लचांड कशाला? रक्तरंजीत आणि युद्ध लढायांमध्ये मध्ये पडून, सनावळ्या लक्षात ठेवून काय करायचं? असे साधे प्रश्न पडत होते? टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून इंडॉलाजी ह्या विषयात पदवी मिळवली विषयाची तोंड ओळख झाली. अनेक नवीन दरवाजे उघडले. त्यातल्या सामान्य माणसाचे आधीच्या जगण्याचा अभ्यास करायचा तर आॅर्किऑलाजी या विषयाला पर्याय नव्हता. हळूहळू हळूहळू लक्षात आले की या विषयाचा आवाका खूप मोठा आहे म्हणून एका छोट्या विषयाची निवड करायला हवी. तरीही एक प्रश्न कुरतडत होता का? कशासाठी हा अभ्यास? त्याचे सांगोपांग उत्तर मात्र what is history by E.H. Carr ह्यांच्या पुस्तकातून मिळाले .

इंग्रजी वाचून झाल्यावर इतिहास म्हणजे काय? हा मराठी अनुवाद प्रा. वि.गो. लेले यांचा कॉन्टिनेन्टल प्रकाशन आणला आणि सांगोपांग वाचून नीट नोद्ध काढल्या.

पहिल्या पानावर " माझ्या मनात पुष्कळदा येते की इतिहास इतका कंटाळवाणा असावा हे किती चमत्कारिक आहे! कारण त्याचा बराचसा भाग काल्पनिक असणार”.

कॅथरीन मूरलॅंड

## इतिहास म्हणजे काय?

इतिहास म्हणजे काय ? हे ई. एच. कार यांचे पुस्तक वाचतांना बरेच प्रश्न पडतात तसेच बरीच कोडी उलगडत जातात. इतिहास संशोधनाच्या आणि लेखनाच्या प्रचलीत पध्दतींचा उहापोह करतांना त्यातील बारीक सारीक गोष्टींचा उलगडा करतात, तसेच धोके आणि चुकीच्या पायंड्यावर ताशेरेही ओढतात. परत परत वाचतांना बऱ्याच वेळा नविन बाबी समजत जातात. सुरवातीला मी मला पडलेले प्रश्न आणि समजलेल्या बाबींचा एक एक प्रकरण असा आढावा घेणार आहे.

त्यांनी पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत आपली मते आणि अनुभव व्यक्त केला आहे. वास्तव परिस्थितीचा आढावा घेत आपली टिप्पणी करतांना ते मार्मीकपणे म्हणतात की, निरागस आत्मविश्वास आणि प्रगतीवरील स्वाभाविक श्रध्देचे व्हिक्टोरियन युग मागे पडले आहे. आज हिंसा आणि वैरापासून मुक्त देश क्वचितच सापडेल अशी खंतही व्यक्त केली आहे. तिसऱ्या जगातील परिस्थिती आणि क्रियाशिलतेची जाणीव आहे. त्यांची ठाम भूमिका ही जागतिक अशांतेला कारण झाली आहे. असे प्रतिपादन करत तेल उत्पादक देशांच्या बंडामुळे जो बदल झाला, तो पाश्र्चात्य देशांना कसा प्रतिकूल झाला आहे. त्यामुळे लेखक वर्गात व पत्रकारिता जगातील निराशाजनक परिस्थितीचे चित्र

रंगवतांना ते जगाच्या अंताची भाकित करत आहे ही वास्तविकता ते मांडतात. त्यांच्या या व्याख्यानमालेत त्यांनी युरोपियन इतिहासाचा आढावा घेतला आहे म्हणून वर्तमानकाळात या देशांच्या राजकारणात आणि अर्थव्यवस्थेत काय चाललंय याची ते दखल घेतात आणि आर्थिक, सामाजिक मानसिकता अभिजनवर्गाच्या लेखन वर्तनाची चिकित्सा केली आहे. या सर्व चिकित्सेतून महत्वाचा मुद्दा मांडला आहे तो असा की "समाजात काही वेगळ्या आणि भिन्न मतधारी व्यक्ती असतात. ते गट कितीही एकजीनसी असले तरी" इतिहासकार हा एकजीनसी पणा गृहीत धरतात. आणि त्यांच्या दृष्टीने ते रास्तही असते बुध्दीवंतही हीच गोष्ट विशेषतः करतात. ती मुठभर लोकांपुरती मर्यादित असतात. दुसरा मुद्दा असा मांडला आहे तो "बौध्दीक निराशावादाचे पीठ" उदाहरणादाखल ते युरोपीय इतिहासाची पेरणी करतात त्यात जागतीक आरिष्टाची भाकीते ,जगाचे स्वामी राहिल्यामुळे संशयवाद, निराशावाद तसेच एकजीनसी पणा गृहीत धरणे यांची मांडणी करून चर्चा करतात.
सर्वात महत्वाच्या वाक्याने ते शेवट करतात तो असा की, भविष्यकाळाबद्दल आशावादी नाही तरी निदान अधिक समंजस आणि समतोल दृष्टीकोन बाळगणे आवश्यक आहे.

हे मला खूप महत्त्वाचे वाटते कारण प्रत्येक बाबतीत विविधता असलेल्या आणि विविध विचारधारा वाढीस लागलेल्या तरीही लोकशाही मार्गाने जाणाऱ्या भारतासारख्या देशात जेव्हा धर्म, जातींना पिडीत असलेल्या महाकाय समाजाचा इतिहास बघतांना जो एकजीनसीपणा शोधावा लागतो आणि वास्तवाचे भान ठेवून पण लिखाण करावे लागते. ऊठसूठ कुठल्यातरी एका गटाच्या भावना दुखावल्या जातात तेव्हा ती तारेवरची कसरत करतांना ही गोष्ट मार्गदर्शक ठरेल.

## पहिल्या प्रकरणात 1 इतिहास आणि घटिते

आपल्या पहिल्या प्रकरणात इतिहास आणि घटिते यांतील  तीस पानांत ते सुरवातीला केंब्रिज विद्यापीठाच्या प्रकाशन संस्थेच्या प्रतिनिधीला अहवालात दिलेले आहेत जे मॉडर्न हिस्टरीच्या पहिल्या आणि दुसऱ्या आवृत्तीतून घेतले आहे तो उतारा व्युद्युक्त करतात. त्यातील महत्वाचा मुद्दा असा होता की एक दिवस अंतीम इतिहास येईल अशी ॲक्टन व त्यांच्या सहायकांची श्रध्दा होती. नंतरच्या साठ वर्षांनंतर असलेल्या दुसऱ्या आवृत्तीत जॉर्ज क्लार्क इतिहासाचे पुनर्लेखन होणार असे माहित असूनही असा सिद्धांत मांडून हा एक न संपणारा शोध आहे असे प्रतिपादन करतात. म्हणून काही अभ्यासक अधिरपणे

संशयवादाचा आश्रय घेतात किंवा असा सिद्धांत स्विकारतात की इतिहास विषयक निर्णय हे व्यक्तिसापेक्ष आणि विशिष्ट दृष्टीकोन व्यक्त करणारे असतात. त्यामुळे सर्व ग्राह्य ठरतात आणि वस्तुनिष्ठ ऐतिहासिक सत्य काही नसतेच.

दोन्ही आवृत्तीच्या काळातील अंतरात पडलेले वेगवेगळ्या प्रकारच्या दृष्टीकोन बदलाची ते चर्चा करतात. इतिहास म्हणजे काय? या प्रश्नाचा विचार करतांना आपण कळत-नकळत ज्या जगात जगत असतो त्या काळाचे प्रतिबिंब पडणार हे उघड आहे ही शक्यता व्यक्त करतात. एकोणिसाव्या शतकातील विविध लेखक विचारवंत यांचा आढावा घेत इतिहासलेखनाच्या प्रक्रियेची चर्चा करतात व महत्वाचा प्रवाह आणि प्रवास निरीक्षण, जाणिवा ज्या इंद्रियांवर बाह्य विश्वाच्या आदळत असतात. तसेच साधने गोळा करून त्यावर प्रक्रिया करत असतात. तथ्य, तथ्यांचा संग्रह, दस्ताऐवज, कोरीव लेख तसेच इतर सामुग्री एकत्र करून आपल्या पद्धतीने समोर ठेवत असतो. तथ्ये आणि मते यांच्या अन्वयार्थ लावण्याची क्रिया आणि तिथल्या निसरड्या वाटांची चर्चा केली आहे. यासाठी एखाद्या घटनेचे पडसाद वेगवेगळ्या पध्दतीने लावले जात त्यांच्या दृष्टीकोनातून कसे बघितले जातात याची चिकित्सा करतात.

ऐतिहासिक तथ्ये आणि भुतकाळातील अन्य तथ्ये यांचा फरक करणारी कुठली कसोटी ? असा प्रश्न उपस्थित केला आहे. ऐतिहासिक तथ्य आणि घटीत म्हणजे काय? याची चर्चा करताना ते म्हणतात की मुलभूत घटना ही सर्व इतिहास कारांसाठी सारखीच असते. त्यात महत्त्वाचे मुद्दा हा की बिनचुकपणा हे कर्तव्य आहे सद्गुण नाही. इतिहासकारांच्या बिनचुकपणाची स्तुती करण्यावर आक्षेप घेतात. इतिहासकारांच्या सहायक बाबी पुरातत्व विद्या, पुराभिलेखशास्त्र नाणकशास्त्र कालनिर्णय शास्त्र ह्या होत. ही तथ्थे म्हणजे इतिहासकाराचा कच्चा माल इतिहास नव्हे ही महत्त्वाची टिप्पणी करायला ते विसरत नाहीत.भुतकाळातील साध्या साध्या घटनांचे ऐतिहासिक घटितात कसे रूपांतर होते याची चर्चा करताना ते विविध साध्या घटना ऐतिहासिक घटनांमध्ये कशा बदल्लया याची कारणमिमांसा करतांना लक्षात आलेल्या बाबी ह्या की आपण वाचतो तो इतिहास तथ्यांवर आधारित असला तरी खऱ्या अर्थाने तथ्यात्मक मुळीच नसतो. मान्यताप्राप्त निष्कर्षांची ती एक मालिका असते. यासाठी ते रशियन शेतकऱ्याचे उदाहरण देतात गाढ धर्म श्रद्धा बाळगणाऱ्या रशियन शेतकऱ्याची प्रतिमा १९१७ च्या क्रांतीने धुळीस मिळाली.

आधुनिक इतिहासकारांच्या बाबतीत चर्चा करताना ते मार्मीकपणे लिटन स्ट्रॅ यांचा वाक्य वापरून," इतिहास काराच्या बाबतीत आवश्यक गोष्ट म्हणजे अज्ञान अज्ञानामुळे सगळे कसे सुलभ आणि सुबोध होवून जाते. अज्ञानामुळे निवडणे आणि वगळणेज्ञही कामे साधली जातात." आपला मुद्दा मांडला आहे.यात निखळ तथ्यांचे संकलन आणि त्यावरील निखळ श्रद्धा या तथ्यांच्या संकलनाचे वेड दस्ताऐवजांवरील श्रद्धा याच्या अतिरिक्त भक्ती मुळे होणारी हानी यावर उजेड पाडून खूप महत्त्वाचे प्रतिपादन करतात ते असे, इतिकाराला नीट अर्थबोध होण्यासाठी दस्त ऐवज समजून घेवून उलगडा करावा लागतो. इतिहास काराला दस्ताऐवज किंवा अन्य साधनांनी उपलब्ध झालेल्या तथ्यांचा त्यावर प्रक्रिया केल्याशिवाय काहीच उपयोग होणार नाही. तो त्यांचा उपयोग करून एक प्रकारे त्यावर प्रक्रिया करत असतो."

पुढील भागात ते इतिहास म्हणजे काय? याचीच एकोणीसाव्या शतकातील इतिहासकारांच्या उदाहरणांनी चर्चा करतात. त्यांच्या समजुती जसे की इतिहास विषयक तत्त्वज्ञान आणि धर्म तसेच जागतिक युध्द त्याकाळी लिहिले गेलेले ग्रंथ एकोणिसाव्या शतकातील उदारमतवादी इतिहास विषयक दृष्टीकोण आणि मुक्त अर्थव्यवस्था यातून तयार झालेले सिध्दांत यासर्व बाबीच्या अनुषंगाने इतिहास म्हणजे काय याचा खल झाला. यात जर्मन, ब्रिटिश आणि इटलीतील तज्ञांनी केलेले इतिहासाचे तत्वज्ञान व क्रोचे यांचे इतिहास हा कोणत्याही काळासंबंधी नसून समकालीन असतो हे प्रतिपादन वर्तमानाच्या चष्म्यातून आणि वर्तमानकालीन समस्यांच्या प्रकाशातून भूतकाळाकडे पाहिजे जाते.इतिहासकारांचे मुख्य काम हे घटनांची नोंद करणे नसून मुल्यमापन करणे हे असते. अशी सगळी विविध विचारवंतांनी केलेल्या चर्चेचा आढावा घेत इतिहासाची कल्पना, गतकालीन घटना नाही तर इतिहासकारांनी केलेल्या घटनांचे विवरण नाही तर दोघांचा अन्योन्य संबंध आहे.कॉलींगहूड यांच्या भुमिकेचा मागोवा घेत सगळा इतिहास विचारांचा असतो इतिहास कार त्या विचारांचा अभ्यास करून पुर्नमांडणी करत असतो.इतिहास हा इतिहासकाराचा अनुभव असून त्याच्या हाती आकार देणे हेच असते.

तथ्यांच्या बाबतीत ती आपल्याला निर्भेळ प्राप्त होत नाही. कारण ती तशी नसतात.ती नोंद करणाऱ्यांच्या मनातून परावर्तित होऊन येतात. म्हणून एखादा ग्रंथ हाती घेतांना तथ्यांची चिंता करण्याच्या आधी लेखक कोण आहे हे पाहिले पाहिजे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा हा की इतिहासकार ज्या माणसांविषयी लिहित असतो त्यांचे मानस, कृत्यांमागील विचार,यांचे कल्पनात्मक आकलन करून घ्यावे लागते. सहानुभुती नाही हे महत्त्वाचे.

तिसरा मुद्दा वर्तमांनाच्या चष्म्यातून भुतकाळाकडे बघतांना असणारे धोके हा आहे कारण लेखक वर्तमान काळाचा प्रतिनिधी असतो तसेच त्या त्या युगाच्या मानवी अस्तित्वाच्या अटींशी जोडलेला असतो. त्यामुळे तत्कालीन मान्यता व शब्दप्रयोग वापरतो. यासाठी आपला मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते प्रो. ट्रेव्हर रापरची म्हणणे मांडतात ते असे की, इतिहासकाराने भुतकाळावर प्रेम केले पाहिजे. हा मुद्दा खोडतांना ते वृध्द आणि जुन्या माणसांचे गतकाळातील प्रेम दर्शवतात ते हळवे असले तरी वर्तमान काळ आणि भविष्यकाळ यातील विश्वास व आस्था गमावल्याचे चिन्ह असते. भूतकाळाच्या निर्जीव पंजाच्या पकडीतून सुटका करून त्यावर प्रेम करण्याची अथवा मुक्त होण्याची गरज नाही तर नीट आकलनाची गरज आहे.

कॉलिंगवुडच्या विचारांचा आढावा घेतल्यावर त्यातील धोके प्रतिपादन करतांना ते म्हणतात की इतिहास लिहिणाऱ्यांने इतिहासकारांच्या भूमिकेला प्राधान्य देऊन तात्त्विक परिणीती गाठली तर इतिहासातली वस्तुनिष्ठता निकालात निघेल.

दुसरा धोका स्पष्ट करतांना ते दृष्टीकोनावर चर्चा करतात. "इतिहास म्हणजे लहान मुलांच्या खेळण्यातली अक्षरपेटी त्या पेटीतील अक्षरे घेऊन पाहिजे तो शब्द बनवावा" फ्राईडच्या या विधानातून संशयवाद, तर मानवी मेंदूची करामत या दृष्टिकोनातून बघत असल्याने वस्तुनिष्ठ इतिहास असे काही नसते आणि इतिहासाला काही अर्थ नसतो हाच धोका संभवतो. मग वेगवेगळ्या सिध्दांतातून वेगळी अन्वयार्थ काढत सारखीच प्रमाण ठरतात का? याचा उलगडा करतांना ते परत गृहितके वर्तमानाच्या चष्म्यातून भुतकाळ बघण्याकडे आणि वर्तमान कालीन उद्दिष्टे गाठण्यासाठी उपयुक्तता याची चर्चा करतात.

आधीच्या विचारवंताच्या चिंतनातून आलेल्या नवीन विचारांना मग काही अर्थ राहणार नाही. स्वत साधने वाचण्यात आणि तथ्यांच्या टिपणांमधून बराच काळ घालवून मग साधने दूर ठेवून टिपणांच्या सहाय्याने ग्रंथ लिहिल्याचे अनुभव सांगतात. वाचन आणि लेखन एकाच वेळी चालू असते.

प्रकरणाच्या शेवटी ते ते इतिहासकार आणि ऐतिहासिक तथ्ये यांच्यातील संबंधाची तपासणी करतांना आपण अवघड जागी आले असून इकडे आड तिकडे विहीर अशी

अवस्था झाल्याचे सांगतात. हे अधिक स्पष्ट करतांना इतिहासकारापुढील आपत्ती ही मानवी स्वभावाचे उदाहरण देवून जसे की अर्भकावस्था व परिपक्व वृध्द या अवस्था सोडल्यातर माणूस पुर्णपणे त्याच्या परिसरात गुतलेला नसतो. स्वतंत्रही नाही आणि स्वामीही नाही.तसेच हे नाते आहे.समानतेचे देवाणघेवाण आहे.तथ्ये आणि अन्वयार्थ या अखंडपणे चालू असलेल्या प्रक्रिया आहे.आणि या प्रक्रियेत वर्तमान काळ आणि भविष्यकाळ समाविष्ट असतो. कारण इतिहासकार वर्तमानात जगत असतो तर तथ्ये भूतकालीन  असतात. दोघांना एकमेकांची गरज असते.

**२. व्यक्ती आणि समाज**

आपल्या दुसऱ्या प्रकरणात व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंध दाखवतांना सुरवातीला डन् यांच्या devotion upon emergent occasions या पुस्तकातील कुणीही माणूस पुर्णपणे स्वायत्त अशा बेटासारखा नाही. प्रत्येक जण महाद्विपाशी जोडलेला आहे ;त्याचा अंश आहे. माणूसाच्या जैविक अवस्थेपासून सामाजिक अवस्थेबद्दलचा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते माणूस समाजात जन्मतो तसेच समाज्याच्या संस्कारातून घडत जातो. भाषा आणि परिसर त्याच्या विचारविश्वाचे स्वरूप निश्चित करतात.लहानपणापासून कल्पना त्याला समाजाकडून मिळतात. समाजापासून अलग झालेल्या व्यक्तीला भाषा आणि मन नसणार हे ते सांगतात. सुधारलेला मानव आणि अप्रगत मानव समाजाची तुलना करतांना सुधारलेल्या समाजाची गुंतागुंत आणि त्यामध्ये वाढलेली व्यक्तीपरायणा आणि अप्रगत समाजातील एकसंधता यांची तुलना करतांनाच व्यक्ती आणि समाज एकमेकांना घडवत असतो आणि विकासही घडवत असतो. गुंतागुंतीच्या समाजाचे परस्परालंबित्व देखील गुंतागुंतीचे आणि प्रगत असते.दुसरा मुद्दा हा की, समाजरचनेत आणि व्यक्तीव्यक्तींमधील भेद आणि या भेदांचा अभ्यास करायचा झाल्यास कोणत्या बाबीत भेद आहेत आणि वेगळी आहे ते समजून घेणे योग्य पर्याय मानतात.

आधुनिक ऐतिहासिक मिथ्यांपैकी व्यक्तीवाद हे सर्वात अधिक प्रस्तृत झालेले मिथ्य आहे असे त्यांना वाटते. व्यक्तीवादी पंथाची सुरवात प्रबोधन काळापासून सुरू झाली तोपर्यंत माणूस वंश, जमात, संघ, कुटुंब किंवा संस्था अशा एखाद्या समूहाचा घटक असे.पुढील काळात उदयाला आलेल्या भांडवलशाही आणि इतर क्रांत्या यांचा आढावा घेत व्यक्तीवाद आणि उपयुक्ततावाद तसेच मानवी सुखाच्या कल्पना आणि व्यक्तीप्रधान सामाजिक परिस्थिती चा उदय आणि मग स्वातंत्र्य समता, सामाजिक न्याय या अमुर्त

संकल्पनांबद्दल बोलतांना व्यक्ती आणि समाज वेगवेगळे नसून समाजातील व्यक्तीसमूह असतात. हे मांडतांना एका महत्वाच्या मुद्याला हात घालून स्पष्ट करतात की व्यक्ती विरूद्ध समाज असे द्वंद्व हे उभे करतांना समाज किंवा राज्य हे साध्य समजून व्यक्तीला साधन साधन मानणाऱ्या विकृत विचारसरणीचा निषेध करण्यासाठी व्यक्तीवादाचा पुरस्कार केला जातो तेव्हा आक्षेपार्थ काही नसून समाजापासून दूर घेवून जाणाऱ्या संकल्पनांचा विचार करत बसलो तर भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचे नीट आकलन होणार नाही.

इतिहास म्हणजे व्यक्तींनी व्यक्तीविषयी केलेले लिखाण हा समज अपूरा आहे, असे म्हणतांना एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे तो हा की इतिहास जी माहिती गोळा करतो ती काही एकट्याची मालकीची वस्तू नसते.ती जमा करण्यात विविध देशांतील अनेक पिढ्यांनी भाग घेतलेला असतो.इतिहासकार ज्या माणसांचा अभ्यास करतो ती माणसेदेखील एखाद्या पोकळीत वावरणारी सुटी माणसे नसतात.ती एका गतकालीन समाजाची घटक असतात.

इतिहासकाराकडे एक किती प्रमाणात सुटी व्यक्ती म्हणून बघता येईल? त्याची तथ्ये किती प्रमाणात व्यक्तीविषयक किती सामाजिक या प्रश्नाची चर्चा करतांना इतिहासकार हा एक स्वतंत्र व्यक्ती असून त्या समाजाचा प्रवक्ता आणि एखाद्या समाजाचा घटक असतो. तसेच इतिहासकाराने उंचावरून नजर टाकण्यापेक्षा आणि महत्वाची व्यक्ती म्हणून मानवंदना स्विकारण्याचा मोह टाळावा असे सांगतात. कारण इतिहासकार हा इतिहासाचा भाग असतो.

इतिहासाला संकलनाच्या पातळीवर आणून ठेवायला आक्षेप व्यक्त करतांना इतिहासकाराला जेव्हा वर्तमानकालीन समस्यांच्या प्रकाशात भूतकाळाचे आकलन करून घेता येते तेव्हा त्याच्या हातून श्रेष्ठ दर्जाचे लेखन होते. आधुनिक इतिहासकारांच्या बाबतीत एक नवीन विचारसरणी पुराणमतवादी विचारसरणीचा पुर्नजन्म झालेल्या घटनेचा आढावा घेताना अनेक इतिहासकारांची चर्चा करतात.व परत एकदा इतिहासकारांच्या इतिहास लेखनाच्या दृष्टीकोनाकडे येतात. इतिहासकाराचे लेखन समजून घ्यायचे असेल तर तो इतिहास कार आपल्या विषयाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो हे समजून घेतलेच पाहिजे.तसेच हा दृष्टिकोन एका सामाजिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमीत रूजलेला असतो. समाजात घडणाऱ्या घटना आणि इतिहासकारांचे लेखन, दृष्टीकोन यांनी चर्चा करत एका मुद्द्यावर येतात तो म्हणजे इतिहासकार ज्या समाजात राहून लेखन करतो तो त्याच्या

लिखाणात परावर्तित होतो. घटना आणि लेखक दोन्ही प्रवाहात असतात. म्हणून एकच इतिहास कार दोन इतिहास लिहू शकत नाही.

इतिहासकार किती प्रमाणात समाजाची निर्मिती करत असतो हे प्रतिपादन करतांना एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश इतिहास कार इतिहासातील घटनांमध्ये प्रगतीचा आविष्कार मानत होते. जोपर्यंत अनुकूल होता. इतर माणसांप्रमाणे स्थळ आणि काळ यांचा प्रभाव इतिहासकारावर होत असतो. इतिहासाच्या घटना व त्याचे पडसाद लेखनात कसे पडले याची उदाहरणे देत फ्रेंच इतिहासकार अक्टनचे म्हणणे की, आपल्या स्वतच्या काळाच्या अवाजवी प्रभावापासून तसेच परिसराच्या जूलूमापासून आणि श.वसातून जी हवा आत घेतो त्या हवेच्या दाबापासून आपल्याला मुक्ती मिळवून देतो तो म्हणजे खरा इतिहास होय. इतिहासकाराला आपल्या समाजाशी असलेल्या नात्याची सर्वाधिक जाणिव असते. तो ती ओलांडायला समर्थ असतो. स्वतचा समाज आणि दृष्टीकोन तसेच इतर काळातील, देशातील समाज आणि त्यांचा दृष्टिकोन समजण्यासाठी समर्थ असतो.म्हणून इतिहास समजून घेण्याच्या आधी इतिहासकाराला समजून घ्या. आणि त्याला समजून घेण्याच्या आधी त्याचा ऐतिहासिक परिसर व सामाजिक परिसर समजून घ्यायला सांगतात. इतिहास कार हा इतिहासाचे आणि समाजाचे अपत्य असतो.

इतिहासातील तथ्यांचा विचार करतांना इतिहासकारांच्या अभ्यासाचा विषय तसेच व्यक्तीचे वर्तन की सामाजिक शक्तीचे कार्य ? याचा विचार करतांना रूळलेल्या प्रांताचा विचार करत व्यक्तीनिरपेक्ष शक्तीवर भर देणाऱ्यांची खिल्ली उडवून वेगवेगळ्या प्रभावशाली व्यक्ती ची चर्चा करत इतिहास म्हणजे थोर पुरूषांची चरित्रे या रूळलेल्या प्रांताचा विचार करत वेगवेगळ्या विचारांचा आढावा घेत मिस वेजवुड यांच्या एका ग्रंथाच्या प्रस्तावनेतील समर्थन मांडतात ते असे की, " समूहाचे किंवा वर्गाचे घटक म्हणून माणसाचे जे वर्तन होते त्यापेक्षा व्यक्ती या नात्याने त्यांचे जे वर्तन होते त्यात मला अधिक रस वाटतो. इतिहासाचे लेखन या किंवा त्या कुठल्याही अंगाने करता येईल कसेही केले तरी ते कमी किंवा अधिक अवास्तव ठरणार नाही. या माणसांनी जी कृत्ये केली त्या कृत्यांच्या पाठीमागे त्याच्या भावना आणि हेतू जाणून घेण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला आहे."

माणसाकडे व्यक्ती म्हणून तसेच समूहाचा घटक म्हणून पाहता येईल.
मानसशास्त्र म्हणजे व्यक्तीचा अभ्यास व समाजशास्त्र म्हणजे समाजाचा अभ्यास याचा भेद स्पष्ट करतांना मानसशास्त्रज्ञांनी व्यक्तीच्या सामाजिक फरिसराचा अभ्यास केला नाही तर ते फार साध्य करू शकणार नाही असा इशारा ते देतात.

मिस वेजवुड यांच्या दूसऱ्या मुद्द्यावर चर्चा करतात ती अशी की, माणसाच्या हातून ज्या कृती घडल्या त्याबद्दल त्यांचे स्वतचे काय म्हणणे होते? याचा शोध घेणे हा इतिहासाचा विषय आहे. याचे खंडन करताना ते म्हणतात की जगन्नियंता, विश्वात्मा, प्रकटणारी नियती, इतिहासाची अधिष्ठात्री देवता अशांसारख्या अमूर्त शक्ती घडामोडींना दिशा देतात अशी समजूत आहे त्यावर माझा विश्वास नाही. आपले मत स्पष्ट करण्यासाठी ते मार्क्सच्या या मताला दुजोरा देतात. "इतिहास काही करत नसतो. त्याच्याजवळ कसलेही गडगंज ऐश्वर्य नसते. तो लढाया लढत नाही. सर्व घडते ते जिवंत माणसांकडून स्वामी तो असतो. आणि लढणाराही तोच असतो"

पुढे आपली दोन मते मांडली आहेत एक म्हणजे इतिहास मोठ्या प्रमाणात संख्यात्मक असतो. इतिहास म्हणजे थोर पुरुषांच्या चरित्राचा ग्रंथ या दोन्ही मुद्दे स्पष्ट करतांना ते कार्लाइल,लेनीन, मॅडेव्हिल, टॉलस्टॉय यांचे संदर्भ घेतात. परत एकदा दृष्टीकोनाची चर्चा करतात इतिहासकाराला ज्याचा मागोवा घ्यायचा असतो तो कृतीच्या पार्श्र्वभूमीचा आणि त्याबाबत कर्त्यांने जाणीवपुर्वक केलेला विचार आणि प्रेरणा अप्रस्तुत ठरण्याची शक्यता असते. समाजाविरुद्ध बंड करणाऱ्या व्यक्तीची लोकप्रिय प्रतिमा स्विकारली तर समाजाविरुद्ध व्यक्ती असे खोटे द्वंद्व उभे केल्यासारखे होईल. कोणताही समाज हा एकजीनसी नसतो.

इतिहासातील बंडखोर व्यक्ती आणि महापुरुषांच्या स्थान यात साम्य आढळते. महापुरूषाचे इतिहासात स्थान काय ? तर महापुरुष एक व्यक्तीच असतो. तो असामान्य

व्यक्ती असल्यामुळे असामान्य महत्वाची घटना असतो. टालस्टाय यांच्या मते थोर पुरुष म्हणजे घटनांना ज्यांच्या नावांची लेबले चिटकवलेली असतात अशा व्यक्ती. हेगेल यांचे विवेचन " युगकर्ता की जो युगकल्पनेला शब्दरूप देवू शकतो. जो लोकांना युगांकाक्षा समजावून देऊन ती साध्य करू शकतो. तो जे साध्य करतो ते त्या युगाचे सार असते. तो युगकल्पनेला प्रकट रूप देतो. "

शेवट करताना, इतिहास ही दोन्ही अर्थांनी भुतकालीन घटना व त्यांचा इतिहासकाराने घेतलेला शोध एक सामाजिक प्रक्रिया असते. त्यात व्यक्ती समाजाचे घटक म्हणून गुंतलेल्या असतात.इतिहासकार आणि त्याची तथ्ये यांच्यातील परस्परसंबंधाच्या अन्योन्य प्रक्रियेला ते वर्तमान काळ आणि भुतकाळ यांच्यातील संवाद म्हणतात. बर्कहार्ड यांच्या शब्दात इतिहास म्हणजे " एका युगाला दुसऱ्या एका युगाच्या बाबतीत दखल घेण्याजोग्या ज्या गोष्टी वाटतात त्यांची नोंद"

माणसाला भूतकाळ समजून घ्यायला समर्थ करणे आणि वर्तमानकाळातील त्याची हुकुमत वाढवणे असे इतिहासाचे दुहेरी कार्य होय.

### 3. इतिहास, विज्ञान आणि नीती

इतिहास, विज्ञान आणि नीती या प्रकरणाची सुरवात करतांना अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यत विज्ञानाने माणसाच्या जगाविषयीच्या आणि स्वतच्या शारीरिक गुणधर्माविषयीच्या ज्ञानात फार मोठी भर पडली होती. त्यामुळे तेच विज्ञान माणसाच्या समाजविषयक ज्ञानाचीही तशीच अभिवृद्धी का करू शकणार नाही, असा प्रश्न विचारला जाऊ लागले. सामाजिक शास्त्रांची इतिहास त्यातील एक संकल्पना विकास पावत राहिली. आणि विज्ञान नैसर्गिक विश्वाचा अभ्यास ज्या पद्धतीने करत होते. ती पध्दत मानवी व्यवहाराच्या अभ्यासाला लावण्यात आली. न्यूटन, हर्बर्ट स्पेन्सर,बर्ट्रान्ड रसेल , डार्विन,कालिंगवुड यांच्या विचारांचा वेध घेत कालिंगहूड यांनी विज्ञान ज्याचा अभ्यास करते ते निसर्गाचे विश्व आणि इतिहासाचे जग यांच्यात भेद करणारी सीमारेषा कटाक्षाने दाखवून दिली. तसेच आधुनिक भौतिक शास्त्रज्ञ ज्यांचा शोध घेतात ती तथ्ये नव्हेत तर घटना असतात.

शास्त्रीय नियमांची संकल्पना विचारात घेतांना अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात शास्त्रज्ञांनी गृहीत धरले होते की न्यूटनचे गतीचे नियम, गुरूत्वाकर्षणाचा नियम, बॉईलचा नियम, उत्क्रांतीचा नियम, इतर नियम अवगत होऊन प्रस्थापित झाले होते. शास्त्रज्ञांचे काम कोणते तर तथ्यांच्या निरीक्षणाद्वारे निगमनाच्या पध्दतीने उपयोग करून नियम शोधून काढणे. याच पद्धतीने शास्त्रीय दर्जा मिळण्यासाठी समाजाच्या अभ्यासकांनी तीच पद्धत स्विकारून राजकीय अर्थशास्त्रज्ञांनी ग्रेशॅमचा नियम, ॲडम स्मिथचे नियम, बर्क यांचे यांनी व्यापाराचे नियम हे निसर्ग नियमानुसार ईश्वरी प्रतिपादन केले. माल्थस, लासाल आणि मार्क्सने आधुनिक समाजासंबंधीच्या आर्थिक गतिनियमांचा शोध या साऱ्यांचा आढावा घेत विज्ञानाची पध्दती मुलत: वर्तूळाकार नसून अन्योन्य असते आणि सिध्दांत आणि तथ्ये, तत्व आणि व्यवहार, यांच्यामधील क्रिया प्रक्रियेच्या मार्गाने नवनवी सत्ये अवगत करून घेण्यासाठी पुढे जायचे असते हा निष्कर्ष काढतात.आपला पुढचा मुद्दा मांडण्यासाठी ते संशोधन प्रक्रियेत इतिहासकार जी गृहितके वापरतात त्यांच्या स्वरूपात आणि शास्त्रज्ञांच्या गृहितकांच्या स्वरूपात लक्षणीय साम्ये आढळतात. यासाठी ते प्रोटेस्टंट पंथ आणि भांडवलशाही यांच्यातील संबंधाची चिकित्सा करतात.तर इतिहासाच्या कालखंडाबद्दल त्याचा वाद हा, मार्क्सवादाचा त्याग केलेल्यांची अवस्था संत्रस्त मानसिक अवस्थेची कबुली देणाऱ्यांसारखी होते हे अर्थशास्त्रज्ञ वेर्नर सोंबार्ट यांच्या आधारे सांगतात. सामाजिक शास्त्रांच्या पद्धतीविषयी एक सर्वसाधारण मत व्यक्त करतात ते की हे विचार धारण करणारे थोर समाजशास्त्र ज्ञ हे भौतिक शास्त्रांचे शिक्षण घेतलेले होते.

पुढील व्याख्यानात ते इतिहास तथ्यात्मक मुळीच नसतो तर मान्यताप्राप्त निष्कर्षांची ती एक मालिका असते या आधीच्या मुद्द्यावर येतांना शास्त्रीय सत्याची व्याख्या तज्ञांनी जाहिरपणे मान्य केलेले विधान याची चर्चा करताना वरील व्याख्या ही अमान्य असून एक इतिहास कार आणि एक पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ एकाच प्रश्नाची मांडणी जवळपास सारखीच करतात ते लक्षणीय आहे. असे म्हणत आक्षेप नोंदवतात ते असे की इतिहासात विवरण असते ते सर्वस्वी अनन्यसाधारणाचे, विज्ञानात सामान्याचे, इतिहासापासून धडे शिकता येत नाही, इतिहास भाकित करू शकत नाही. इतिहास अनिवार्य पणे आत्मनिष्ठ असतो. कारण माणूस स्वत:चेच निरीक्षण करीत असतो आणि विज्ञानाहून वेगळेपण हे की यात धर्म आणि नितीच्या प्रश्नांचा अंतर्भाव होतो.

(धर्म आणि व्यवस्था या कृत्रिम गोष्टी आहेत)

वरील मुद्द्यांचे स्पष्टीकरण करतांना एक युक्तिवाद असा केला जातो तो हा की, इतिहास जे अनन्यसाधारण आणि विशिष्ट असेल त्याचा शोध घेतो. तर विज्ञान सामान्य आणि सार्वत्रिक सत्याचा. अरिस्टॉटल पासून हा दृष्टिकोन सुरू झाला. त्यांचे प्रतिपादन असे होते की "काव्य इतिहासापेक्षा अधिक गंभीर आणि तात्वीक असते कारण काव्यात सामान्य सत्याचा आविष्कार होतो तर इतिहासात विशिष्टांचा" हा दृष्टिकोन गैरसमजावर आधारित होता हे ते स्पष्ट करतांना भौतिक शास्त्रज्ञ भुगर्भरचना तसेच भाषिक तत्ववेत्त्यांचे लोकप्रिय वचन प्रत्येक गोष्ट जशी असते तशीच असते. अन्य काही नसते असा विचार करत निर्वाणपदाला पोचाल आणि मग कशाचेच महत्व नसणार.

भाषेचा उपयोग इतिहासकाराला सामान्यीकरणाला बांधून टाकतो हा पुढचा मुद्दा मांडताना ते युद्ध आणि वेगवेगळ्या कारणांसाठी झालेल्या क्रांती यासाठी इतिहासकार युद्ध हाच शब्द वापरतील जरी त्या घटना पुर्णपणे भिन्न असल्यातरी. इतिहास कार पुराव्यांची सत्यता पारखण्यासाठी सतत सामान्यीकरणाची आश्रय घेतात. याच्या स्पष्टीकरणासाठी ते गढीतील राजपुत्राची हत्या झाली या घटनेची कशी कारणमिमांसा केली जाईल की त्या काळात राज्यकर्त्यांची सिंहासनासाठी संभाव्य प्रतिस्पर्धी आपल्या मार्गातून दूर करण्यासाठी कोणती पध्दत होती? आणि याबाबत जर त्याने सामान्य करणाच्या आधारे घेतला तर रास्तच होईल. लेखकाप्रमाणे वाचकही सामान्यीकरण करत असतो.तो स्वतला परिचित आणि समकालीन अशा संदर्भात इतिहासकाराची मते ताडून पाहतो. यासाठी ते स्वतचे उदाहरण देतात जे रशीयन राज्यक्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांती ताडून पाहतात. इतिहासाचे पोषणच मुळी सामान्यीकरणावर होते हा मुद्दा ते मांडताना एल्टन यांनी नव्या केंब्रिज माडर्न हिस्टरी या पुस्तकातील ऐतिहासिक तथ्यांच्या संकलकाहून इतिहासकाराचे वेगळेपण सामान्यीकरण करण्यात असते.

इतिहास आणि समाजशास्त्र यांच्या संबंधाविषयी चर्चा करतांना दोन धोके संभवतात एक अतितात्विक होण्याचा किंवा अतिअनुभविक होण्याचा यात समाजशास्त्राचे इतिहासापासून वेगळेपण त्या शास्त्राला नियम असण्यात आहे, हे प्रो. पॉपर यांचा दृष्टिकोन सांगत स्पष्ट करतात तर . दुसरा धोका कॉर्ल मॅनहीम यांनी एका पिढीपूर्वी ओळखला होता. तो धोका आहे तो म्हणजे समाजशास्त्र सामाजिक पुनर्व्यवस्थेसंबंधी अलग अलग तांत्रिक प्रश्नांमधे विभागले जाईल. समाज शास्त्र अभ्यास करतेज्ञते ऐतिहासिक समाजांचा त्यातील प्रत्येक अनन्यसाधारण असतो. आणि विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीने आणि

घडामोडींची घडवलेला असतो. इतिहास अधिक समाजशास्त्रीय आणि समाजशास्त्र अधिक इतिहासशास्त्रीय बनल्यास दोन्ही शास्त्रांना उपकारक ठरेल आणि त्यांच्या तील सीमारेषा देवाणघेवाण करण्यासाठी खूल्या असल्या पाहिजेत असा सल्ला देत ते पुढच्या मुद्द्याकडे वळतात. तो म्हणजे इतिहासाची शिकवण सामान्यीकरणाचा बाबतीत खरा मुद्दा हाच की त्यायोगे आपण शिकण्याचा प्रयत्न करत असतो. घटनांच्या एका संचापासून घेतलेल्या धड्याचे उपयोजन दुसऱ्या संचाच्या बाबतीत करत असतो. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी ते इतिहासातील विविध उदाहरणे देतात. दुसरा मुद्दा असा की इतिहासापासून शिकण्याची प्रक्रिया ही एकतर्फी नसते भूतकाळाच्या प्रकाशात वर्तमानकाळ समजून घेणे म्हणजेच वर्तमानकाळाच्या प्रकाशात भूतकाळ समजून घेणे. भूतकाळ आणि वर्तमानकाळाचे त्यांच्या परस्परसंबंधाच्या सहाय्याने सखोल आकलन करून घेणे हे इतिहासाचे कार्य असते.

तिसरा मुद्दा हा आहे की इतिहासातील भाकितांचे स्थान काय आहे असे म्हटले जाते की इतिहासापासून काही शिकता येत नाही कारण इतिहास विज्ञानाप्रमाणे भाकित करू शकत नाही. हा गैरसमज आहे आणि तो दूर करण्यासाठी ते विज्ञानाचे नियम हे दिशादर्शक असतात विशिष्ट घटनेत काय घडले हे सांगता येईल असा दावा नसतो. यासाठी गुरूत्वाकर्षणाच्या नियमानुसार असे सिद्ध होत नाही की विशिष्ट सफरचंद जमिनीवर पडेल आणि कुणीतरी ते टोपलीत पकडेल. आधुनिक भौतिक सिध्दांत फक्त घटनांची संभवनीयता दर्शवतात. विज्ञानामुळे दुरदृष्टी प्राप्त होते आणि दुरदृष्टी कृतीला प्रेरणा देते. पुढील व्याख्यानात ते समाजशास्त्र आणि भौतिक शास्त्रांच्या तुलनेत आणि परस्परसाम्याबद्दल बोलतांना ते बरोबरी करू शकतील असे नाही पण सामाजिक शास्त्रे ही भौतिक शास्त्रांच्या तुलनेत मागासलेली आहे हे ही कारण नव्हे तर कोणत्याही दृष्टीकोनातून पाहिले तरी प्राणी जगात मानव जात सर्वात अधिक जटिल अशी जात आहे. त्यामुळे मानवी वर्तनाच्या अभ्यासात वेगळ्या प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागत असेल अशी शक्यता आहे तर मुलभूत उद्दीष्ट आणि पध्दतीत यांच्या बाबतीत फारसा फरक नसतो.

चौथा मुद्दा हा सामाजिक शास्त्रे आणि भौतिकशास्त्रे यांच्या सिमारेषा ठरवणे हा आहे. सामाजिक शास्त्रांत अभ्यासविषय आणि अभ्यासक एकाच प्रकारात मोडतात आणि एकमेकांवर प्रक्रिया करत असतात.इथे फक्त जैविक आणि शरीररचना व प्रतिक्रियांचा अभ्यास करून समाधान होत नाही तर समाजशास्त्रज्ञांना, इतिहासकाराला अर्थशास्त्रज्ञाना ज्या मानवी वर्तनाचा सूक्ष्म वेध घ्यायची गरज असते आणि त्यात इच्छा शक्ती क्रियाशील

असते त्याचा अभ्यासाचा विषय असलेली माणसे जी कृत्ये करतात त्यातील हेतू समजून घ्यायचे असतात.त्यामुळे अभ्यासक आणि अभ्यासविषय यात एक संबंध प्रस्थापित होतो. इतिहासकारांच्या प्रत्येक निरीक्षणातून दृष्टीकोन प्रतिबिंबित होतो. निरीक्षणाची प्रक्रिया निरीक्षण विषयांवर परिणाम करते आणि त्यात बदल घडवून आणते. आणि हे दोन विरुद्ध प्रकाराने घडते. उदाहरणार्थ फ्रेंच राज्यक्रांती चा शेवट नेपोलियन मध्ये झाला. हे बोल्शेविकांना माहित होते त्यांना भिती वाटत होती की आपल्या क्ऱातीचा शेवट तसाच होईल म्हणून नेपोलियन पेक्षा कमी साम्य असलेल्या स्टॅलिनची निवड केली. पण ही प्रक्रिया उलट दिशेने देखील घडेल. वेगळेपणा दाखवण्यासाठी अजून एक हे की ज्ञाता आणि ज्ञेय याबाबत जे प्रश्न उपस्थित होतात ते अधिक गुंतागुंतीचे असतात. माणूस आणि बाह्य विश्व यांच्यात भेद आणि अलगपणाही दर्शवणारे पारंपरिक ज्ञान शाखांमध्ये आणि ज्ञाता व ज्ञेय यांच्या तील स्पष्ट विभाजन गृहीत धरून जे स्वरुप होते ते. म्हणून आधी सुचवले होते की इतिहासाच्या ज्ञानशाखेचा पारंपरिक ज्ञांनशाखेशी मेळ घालणे कठीण आहे. सर्व सामाजिक शास्त्रांच्या बाबतीत अभ्यासक, आणि अभ्यासविषय संशोधन आणि संशोधन विषय या दोन्ही त माणूस गुंतलेला असल्यामुळे ज्ञाता आणि ज्ञेय यांच्यात पुर्ण अलगता कल्पिणारे कोणतेही ज्ञानशास्त्र या शास्त्रांना अनुरूप नाही.

शेवटचा मुद्दा इतिहासाचा धर्म आणि नीतीशी निकटचा संबंध असल्याने तो सर्वच शास्त्र आणि अन्य सामाजिक शास्त्रांच्या बाबतीत भिन्न आहे. इतिहास आणि धर्म यांच्या भूमिका स्पष्ट करतांना इतिहास आणि नीतीचा निकटचा संबंध असल्यामुळे तो सर्वच शास्त्राहून भिन्न आहे. येथे श्रद्धा आणि अभ्यासकांचे तसेच परमेश्वराबद्दलची चर्चा केली आहे आणि ती करतांना फादर डी अर्सी यांच्या पुस्तकात भेद स्पष्ट केला तो असा की इतिहासकाराला ईश्वराकडे बोट दाखवून इतिहासातील प्रत्येक घटनेची मिमांसा करून चालणार नाही. ऐहीक आणि मानवी जिवनातील घटनांचे व्यवस्थित विवरण करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे. लुथरवादी धर्मशास्त्रज्ञ कार्ल बार्थ यांनी इतिहासाचे दैवी आणि ऐहिक असे भेद मांडले आहेत. ऐहीक घडामोडी ऐहिक इतिहासासाठी राखून ठेवल्या.शेवटी इतिहासकाराने एखाद्या संकटप्रसंगी धावून येणाऱ्या देवाचा आश्रय न घेता आपले प्रश्न सोडवले पाहिजेत तसेच इतिहासाचा खेळ जोकरशिवाय खेळला पाहिजे.

इतिहासाचा नितीशी संबंध अधिक गुंतागुंतीचा आहे. इतिहासकाराला इतिहासागत व्यक्तीच्या खाजगी जीवनाबद्दल नैतिक भाष्य करण्याची गरज नसते तसेच इतिहासकाराचे

आणि नितीवाद्यांचे दृष्टीकोन तंतोतंत जुळणारे नसतात हे सांगत स्टलिनचे आपल्या दुसऱ्या बायकोशी वर्तन क्रूरतेचे होते असे म्हणत असतांना सोव्हियट जीवनाचा इतिहासकार म्हणून त्याच्याशी माझा फारसा संबंध आहे असे वाटत नाही याचा अर्थ काजगी नितीमत्त्येला महत्व नाही किंवा नितीकल्पनांना इतिहासात स्थान नाही पण आपली मर्यादा ओलांडून इतिहासकार खाजगी जिवनाचा नैतिक निर्णय करणार नाही हे प्रामुख्याने स्पष्ट करतात.हीच चर्चा उदाहरणे देत इतिहासकार हा न्यायाधीश नसतो. देहांताची शिक्षा देणारा तर नसतोच. ज्या समाजाने हिटलर निर्माण केला त्या समाजाचे नैतिक मुल्यमापन न करता इतिहासकाराने हिटलरच्या वैयक्तिक दुष्टपणाचा धिक्कार केला तर आजच्या जर्मनांना समाधानकारक व स्वागतार्ध वाटते.अशी उदाहरणे घेत नैतिकतेचा मुद्दा मांडला आहे.एंजल्सचा इतिहासाइतकी क्रूर देवता नसते तिचा विजयी रथ केवळ युध्दात नव्हे तर शांततामय आर्थिक विकासकाळातही प्रेतांच्या ढिगाऱ्यावरून मार्गक्रमण करत असतो. दु:खाच्या समस्येचे उत्तर धर्मशास्त्राजवळ नसते.

इतिहासकाराला नैतिक चिकित्सेच्या प्रश्नात शिरावे लागते.शास्त्रज्ञाना याची गरज नसते. पुढे खूप महत्त्वाचे मुद्दे हे आहेत की इतिहासात किंवा दैनंदिन जीवनात आपण ज्या नितीनियमांचे पालन करतो ते बॅकेतील हुंडीसारखे असतात. एक भाग छापील तर एक लिखीत मजकुराचा जसे स्वातंत्र आणि समता न्याय लोकशाही सारखे शब्द दुसरा भाग पुर्ण केल्याशिवाय अर्थ नसतो.

नैतिक प्रश्नांबद्दल समकालीन बाबतीत केले जाणारे परस्पर विरोधी दावे. लोकशाही आणि स्वातंत्य या कल्पना अमूर्त आणि वैश्विक आहे. इष्टाइष्टता विवेक यांचा विचार करतांना जो इतिहासकार प्रश्नांची आगावू उत्तरे स्विकारतो तो बुध्दी गहाण टाकतो आणि आपल्या विद्याभ्यासाची प्रतारणा करतो. इतिहास म्हणजे गती आणि गतीमध्ये तुलना अभिप्रेत असते. म्हणून नैतिक स्वरूपाच्या अभिप्राय चांगले अथवा वाईट असे न देता पुरोगामी, प्रतिगामी असे अभिप्राय देण्याकडे इतिहासकाराचा कल असतो. प्रत्येक जनसमूहाची स्वतची मूल्ये असतात आणि ती इतिहासात रूजलेली असतात. प्रत्येक समूह परकिय आणि गैरसोयीच्या मुल्यांपासून स्वतचे संरक्षण करतो. इतिहास इतिहासबाह्य कुठल्याही प्रमाण तत्वावर अवलंबून नसतो. त्याबाबत इतर शास्त्रापेक्षा वेगळा नाही.

इतिहासाचा शास्त्रात समावेश केला पाहिजे हा दावा करण्यासंबंधीच्या विचारांचा आढावा घेतांना पूर्वीची मानवविद्या आणि विज्ञान ही विभागणी प्रथा गृहितकांवर आधारित

होती ज्या सत्ताधारी वर्गाच्या उच्च संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात.इतिहासाला शास्त्र मानण्यास नकार देणाऱ्यांबद्दल आक्षेप नोंदवतांना तथाकथित दोन संस्कृतीतील दरीचे समर्थन होत ती टिकवली जाते. ही दरी ज्या जुन्या पुर्वग्रहाचे फळ आहे तो इंग्रजी समाज वर्गीय रचनेवर आधारित होता.ती रचना आता इतिहासजमा झाले आहे. यावर उपाय म्हणजे इतिहासलेखन अधिक शास्त्रीय झाले पाहिजे. इतिहास अभिजात साहियापेक्षा अधिक अवघड आणि कुठल्याही शास्त्राइतका गहन आहे.

दरी बुजवण्याचा दुसरा मार्ग म्हणजे शास्त्रज्ञ आणि इतिहासकार यांच्यातील एकवाक्यता आणि आकलन विज्ञानाचा इतिहास आणि विज्ञानाचे तत्वावज्ञान यांच्या मधील कुतुहल वाढवणे. अधिक शास्त्रीय होण्यासाठी इतिहासकाराने भौतिक शास्त्रांच्या पध्दती काटेकोर पाळल्या पाहिजेत. अन्य शास्त्रज्ञांप्रमाणे इतिहासकार का हा प्रश्न विचारणारा प्राणी आहे.

**4 इतिहासातील कार्यकारण संबंध**

इतिहासातील कार्यकारण संबंध समजून सांगतांना दूध उकळत ठेवले तर ते ऊतू जाते ही प्रक्रिया स्वाभाविक आहे तशीच त्यामागे काही शास्त्रीय कारणे सुध्दा आहेत ती जरी माहिती नसली तरी आधीच्या अनुभवातून माणूस शिकलेला असतो.

इतिहास म्हणजे कारणांचा अभ्यास म्हणून इतिहासकार सतत का हा प्रश्न विचारत असतो.त्याला जोपर्यंत उत्तर मिळण्याची आशा असतो तोपर्यंत तो शोध घेत रहातो.

हाच मुद्दा पुढे स्पष्ट करण्यासाठी ते इतिहासाचा जनक हेरोडोटस यांनी आपल्या इतिहासाच्या ग्रथाच्या प्रारंभी आपला हेतू स्पष्ट केले तो असा की ग्रीक लोक आणि परकिय लोक यांच्या संबंधाच्या स्मृती जपून ठेवणे तसेत त्यांच्या संघर्षाची कारणे स्पष्ट करणे हे होय.

अठराव्या शतकात जेव्हा इतिहासलेखनाचा पाया घातला गेला तेव्हा मांतेस्क्यिय यांनी आपल्या ग्रंथात आरंभी जी तत्वे मांडली त्यात, प्रत्येक राजसत्ताक राज्यात सर्वसामान्य नैतिक आणि भौतिक अशी काही कारणे कार्यरत असतात की ती त्या राजवटीला सत्त्येवर आणतात, टिकवून ठेवतात किंवा उलथून टाकतात.जे घडते ते सर्व या कारणांमुळे .

पुढील दोनशे वर्षे इतिहासकार आणि इतिहासाचे तत्वव्येत्ते मानवजातीच्या गतकालीन अनुभवांना व्यवस्थित रूप देण्यात गुंतले होते. त्यासाठी त्यांनी ऐतिहासिक घटना आणि त्यांची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला.कधी ही कारणे आणि नियम यांत्रिक असल्याचे मानले तर कधी जीवशास्त्रीय,आध्यात्मिक, अर्थशास्त्रीय तर कधी मानसशास्त्रीय होते.

पुढील काळात थोडे चित्र बदलून आपण ऐतिहासिक कारणांच्या भाषेत बोलत नाही कारण कारण हा शब्दही आपल्या परिपाठातून गेला आहे त्याचे कारण शब्दाच्या तात्त्विक कल्पनेतील संदिग्धता असे म्हणत पुढच्या मुद्दयाला हात घालतात तो म्हणजे आपल्या मनाने त्याची नियतीवादाशी सांगड घातली आहे म्हणून काही लोक कारणाऐवजी स्पष्टीकरण किंवा विवरण, प्रसंगाचे तार्किक स्वरूप असा शब्दप्रयोग करतात.

जेव्हा घटनांची कारणे निश्चीत करण्याची गरज निर्माण होते तेव्हा इतिहासकार कोणता मार्ग अनुसरतो.इतिसासकार कारणाची बहुविविधता विचारात घेतो. यासाठी परत रशियन क्रांतीची कारणमिमांसा करतांना ते म्हणतात युध्दामुळे कोसळलेली अर्थव्यवस्था,शेतीचा प्रश्न सोडविण्यासाठी झारला आलेले अपयश, बोल्शेविकांचा परिणामकारक प्रचार आणि इतर अनेक. तात्पर्य एवढेच की आर्थिक, राजकीय, तात्विक, वैयक्तिक, अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा कारणांचा एकत्रित विचार करणे होय.

इतिहासकारांच्या दुसऱ्या वैशिष्ट्याकडे येतांना या सर्व कारणांचा संकलित करून यादी तयार करून त्यांची पध्दतशीरपणे व्यवस्था लावून, क्रमवारी ठरवून सर्व कारणांतील अंतीम कारण शोधावे लागते.यासाठी वेगवेगळ्या इतिहासकारांची उदाहरणे देत या कारणांच्या क्रमवारीचा प्रत्येक प्रश्न ऐतिहासिक चिकीत्सेत मध्यवर्ती असतो.

हेत्री पुऍकारे यांच्या ग्रंथातील 'प्रत्येक शास्त्र एकाच वेळी विविधता आणि व्यामिश्रता तसेच एकवाक्यता आणि सुबोधता यांच्या दिशेने वाटचाल करीत असते. ही दुहेरी आणि बाह्यतः परस्परविरोधी वाटणारी प्रक्रिया ज्ञानाची एक आवश्यक अट असते.'

इतिहासाच्या बाबतीत ते खरे आहे. इतिहासकार आपल्या संशोधनाची व्याप्ती वाढवतोते सखोल करण्यासाठी बर्नाड रसेल यांचे विचार आहे की जेव्हा एखाद्या शास्त्राचे पाऊल पुढे पडते तेव्हा प्रथम ढोबळ भासणाऱ्या साम्यांच्या जागी कारणपरिणामांची अधिक सूक्ष्म साखळी आढळून येते तसेच संबंधित कारणांचे क्षितीज अविरतपणे विस्तारतांना दिसते.

दिशाभूल करण्यासाठी रूचकर आमिषे असे नियतीवादाचे वर्णन करीत ते पुढील मुद्द्यावर येतात. वेगवेगळ्या काळातील लिखाणाचा आढावा घेत विविध लेखकाच्या विचारधारा उद्युक्त करतात. प्रत्येकाने हेगेल व मार्क्सच्या नियतीवादावर उपहासाने लिहीत इतिहासात योगायोगाची अपेक्षा करणे कसे हास्यास्पद आहे हे लक्षात आणून दिले आहे.

नियतीवादाची व्याख्या करतांना ती इतिहासाची नव्हे तर मानवी वर्तमानाची समस्या आहे, ज्यांच्या कृतीला काही कारण नाही.म्हणून निश्चित पणे काही सांगता येत नाही

असा माणूस कल्पना करू शकतो. मानवी वर्तनाच्या मागे काही कारणे असतात.ती निश्चित करता येतात हे तत्व गृहीत धरले तर रोजचे जीवन कठीण होईल. एकेकाळी निसर्गातील घडामोडींची कारणे शोधणे पण अधर्म्य होते.

रोजच्या जीवनातील उदाहरण देत त्यात संकल्पस्वातंत्र आणि नियतीवाद असा पेच उपस्थित होत नाही. तर सर्व मानवी कृती स्वतंत्र आणि नियत असतात. तुमचा दृष्टीकोनातून पाहतात यावर ते अवलंबून आहे. तर रोजच्या व्यवहारात नैतिक जबाबदारी महत्वाची असते.ती वेगवेगळ्या बाबीवर अबलंबून असते तसेच सामाजिक असते. इतिहासकारांच्या बाबतीत सर्वसामान्य माणसाप्रमाणे त्याचीही अशी समजूत असते की मानवी कृतीला कारणे असतात. ती तत्वत: निश्चित करता येतात. जर हे गृहितक स्विकारले नाही तर रोजच्या जिवनाप्रमाणे इतिहासही अशक्य होईल. या कारणांचे संशोधन हे इतिहासकाराचे विशेष प्रकारचे काम असते. त्यामुळेच त्याला मानवी वर्तनाच्या पुर्वनियत स्वरूपाबद्दल विशेष कुतूहल असते असे मानता येईल.

पुढे अपरिहार्यतेच्या आरोपांबाबत तो कसा पोकळ आणि अर्थहीन आहे याबद्दल विचार करतांना त्याचे उगमस्थान हे जर तरचा विचार संप्रदाय किंवा भावनासंप्रदाय आहे जो बहुतकरून समकालीन इतिहासात रस घेतो. हा मुद्दा मांडताना ते परत रशियन क्रांतीचा आधार घेतात. इतिहासात जरतरचा खेळ नेहमी गप्पागोष्टीत चालतो. त्याचा नियतीवादाशी काही संबंध नाही. नियतीवाद फक्त इतकेच म्हणेल की घटना वेगळ्या प्रकारे घडण्यासाठी काही कारणे देखील वेगळी असणे आवश्यक असते. जी घटना घडून गेली आहे पण ती लोकांच्या स्मरणात आहे आणि तिचे परिणाम सुखद होणार असा भ्रम असलेले लोक जेव्हा त्याबद्दल इतिहासकाराने लिहिलेले सुखद स्वप्न पूर्ण होत नाहीत तेव्हा ती प्रतिक्रिया ही शुध्द भावनात्मक असते आणि अन ऐतिहासिक सुध्दा असते. ही ऐतिहासिक अपरिहार्यतेच्या मानवी सिध्दांता विरूद्ध जी मोहिम अलिकडे चालू आहे तिला वरील प्रक्रियेने इंधन पुरवले जाते.

इतिहास ही साकल्येवरून एक अपघाताची कथा आहे. ती एका यदृच्छेने घडत जाणाऱ्या घटनांची मालिका आहे. त्यांची कारणे शुल्लक असतात. या युक्तिवादाला स्पष्ट करतांना ते क्लिओपात्राचे उदाहरण देतात. या प्रश्नात नियतीवादाचा संबंध नसून अंटनीचे क्लिओपात्राच्या मोहात पडणे हे स्त्रीसौंदर्य आणि त्याबद्दल पुरूषाला वाटणारे आकर्षण या दोहोंतील कारणपरिणामांचा संबंध ही रोजच्या जीवनात घरघडी आढळून येणारी बाब

आहे.हे तथाकथित योगायोग कारणपरिणामाच्या साखळीच्या शोधात असतो तीत ते व्यत्यय आणतात. त्याबद्दल बरी यांनी दोन स्वतंत्र्य कारणश्रृखलांची टक्कर असे म्हटले आहे.

इतिहासातील योगायोगावर अलिकडे जो भर दिला जातो याचा उगम शोधतांना पॉलिबियन आणि गीबन यांनी पध्दतशीरपणे चर्चा केली आहे. गिबन म्हणतो ग्रीसला साम्राज्यातील केवळ एक प्रांत असे स्वरूप प्राप्त झाल्यावर ग्रीकांनी रोमच्या यशाचे श्रेय रोमनांच्या कर्तृत्वाला न देता त्यांच्या बलवत्तर दैवाआ दिले. ब्रिटिश इतिहासकार योगायोगाच्या महत्त्वावर नव्याने भर दिला कारण या काळात जीवनावर अनिश्तितेची आणि भितीची छाया क्रमाने वाढत गेली. याच काळात जेव्हा इतिहास म्हणजे योगायोगाने घडणाऱ्या घटनांचा ग्रंथ हा सिद्धांत लोकप्रिय असतांना फ्रान्समध्ये एका तत्वज्ञानसंप्रदायाचा उदय झालेला दिसतो.

मार्क्सने फक्त एकदाच तेही लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'जर इतिहासात योगायोगाला स्थान नसते तर त्याचे स्थान नसते तर त्याचे स्वरूप फार गूढ झाले असते. इतिहासाचा जो सर्वसाधारण प्रवाह असतो. त्याचा खुद्द योगायोग हा स्वाभाविकपणे एक भाग असतो. आणि योगायोगाच्या अन्य प्रकारांनी त्याची भरपाई होते. पण प्रवाहाची गती वाढवणे किंवा मंद होणे हे अशा आकस्मिक गोष्टींवर अवलंबून असते. आणि त्यातील योगायोगाचा एक प्रकार म्हणजे एखाद्या चळवळीच्या प्रारंभकाळात तिचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीची विशिष्ट मन: प्रवृत्ती' होय.'म्हणून योगायोगाला फार महत्त्व देण्याचे कारण नाही असे मानत एका योगायोगाची भरपाई दुसऱ्या घटनेमुळे होते आणि परिणामी योगायोग एकमेकांना निष्फळ ठरवतात.तिसरे असे की योगायोगाचा आविष्कार आविष्कार व्यक्तीच्या मनप्रवृतीच्या बाबतीत होतो.

इतिहासातील योगायोग केवळ आपल्या अज्ञानाचे माप दाखवून देतो. आणि ज्याचे आपल्याला आकलन होत नाही त्याला आपण योगायोग हे नाव देतो हा दृष्टिकोन अपुरा वाटतो असे म्हणत ते पुढे एखाद्या घटनेचे दुर्दवी असे आपण वर्णन करतो तेव्हा त्या घटनेचे कारण शोधण्याचा कंटाळा आला असतो आणि इतिहासात जेव्हा अपघाती घटनांचा ग्रंथ आहे तेव्हा त्यांच्यात बौध्दीक आळस असल्याचा संशय ते व्यक्त करतात. योगायोगाच्या समस्येचे उत्तर संकल्पनांच्या एका वेगळ्या कोटीत शोधले पाहिजे.

इतिहासाचे तथ्यांशी जसे नाते असते तसेच कारणांशीही दुहेरी आणि अन्योन्य नाते असते. इतिहास ही एक अशी प्रक्रिया आहे की जीत ऐतिहासिक महत्त्व ध्यानात घेऊन निवड करावी लागते इतिहास म्हणजे केवळ वास्तवाचे आकलन नव्हे तर त्यांची कारणमिमांसा करण्यासाठी अंगिकारले प्रक्रिया आहे ज्या प्रमाणे तथ्यांच्या महासागरातून इतिहासकार त्याच्यापुढील अभ्यासविषयक दृष्टीने वाटणाऱ्या तथ्याची निवड करतो त्याचप्रमाणे कारण परिणामांच्या अनेक क्रमवारीतून फक्त ऐतिहासिक दृष्टीकोनातून अर्थपूर्ण वाटणाऱ्या क्रमवारीची निवड करतो. हे टालकॉट पार्सन्सच्या भाषेत ते सांगतात.

पुढे ऐतिहासिक अर्थपूर्णतेचे प्रामण्य कोणते याची चर्चा करतांना तार्किक स्पष्टीकरणाचा व अन्वयार्थाचा आकृतीबंध असतो त्याच्याशी त्या अर्थपूर्णतेची सांगड घालण्याची क्षमता होय . हीच चर्चा पुढे चालू ठेवत मीनेकेंच्या शब्दात ' इतिहासात मूल्ये विचारात न घेता कारणांचा मागोवा घेणे अशक्य आहे

कारणांच्या मागोव्यात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मूल्यांचा मागोवा नेहमीच अभिप्रेत असतो. वर्तमानकाळ ही भूतमान आणि भविष्यकाळ यांना जोडणारी काल्पनिक रेषा आहे. हे म्हणत इतिहास कार का या प्रश्नाबरोबर कुठे हा ही प्रश्न विचारत असतो असा समारोप करतात.

**5 प्रगतिस्वरूप इतिहास**

प्रो. पॉविक यांच्या भाषणातील उतारा उदाहरण म्हणून देत सुरवात करतात. “इतिहासाला अर्थ देण्याची आपली उत्कट इच्छा असते. इतकी की जर आपल्याजवळ भूतकाळासंबंधी एखादा विधायक दृष्टिकोन नसेल तर आपण गूढवाद किंवा अश्रध्दावाद यापैकी एका गोष्टीच्या आहारी जाऊ."

गुढवादी दृष्टीकोन म्हणजे इतिहासाचा अर्थ इतिहासाच्या बाहेर कुठेतरी ईशाविज्ञानात किंवा परलोकविज्ञानात असतो असे मानणे. दोन्ही दृष्टीकोन अश्रध्दावाद आणि गुढवाद नाकारत ' भूतकाळासंबंधी विधायक दृष्टिकोन' हा वाक्प्रचार वापरत,"आशियातील प्राचीन संस्कृती प्रमाणेच ग्रीस आणि रोमच्या प्राचीन संस्कृती देखील मूलतः इतिहासाचे भान नसलेल्या संस्कृती होत्या". असा आरोप केला आहे.

माणसांना भूतकाळात रस नसतो त्यामुळे भविष्यकाळातही रस असण्याचे कारण नाही असे ल्यूक्रेशसने लिहिले आहे.

दुसरा मुद्दा हा आहे की, उज्ज्वल भविष्यकाळाच्या काव्यमय कल्पनांचे दुसरे रूप म्हणजे भूतकाळातील सुवर्णयुग पुन्हा अवतरतात ही आशा बाळगणे.

निसर्गप्रक्रियेत इतिहास प्रक्रियेचा समावेश करणारा हा चक्रीय दृष्टिकोन होय.

इतिहासाच्या बाबतीत पूर्णपणे नविन कल्पना प्रचलीत केली. ती प्रथम ज्यूंनी आणि त्यानंतर ख्रिश्चनांनी. ऐतिहासिक प्रक्रियेला एक उद्दिष्ट आहे या गृहितकावर आधारलेला हा इतिहासाचा प्रयोजनगर्भ दृष्टीकोन होय. उद्दिष्ट गाठल्यानंतर इतिहासाचा आपोआपच शेवट होणार त्यामुळे इतिहासाला ईश्वरसत्तावादाचे स्वरूप प्राप्त झाले. प्रबोधनाच्या काळात मानवकेंद्रीत विश्वाच्या दृष्टीकोनाची आणि विवेकवादाच्या प्राथम्याची पुनर्स्थापना झाली. त्या युगाने भविष्यकाळाविषयी प्राचीन निराशावादी दृष्टीकोनाच्या जागी ज्यू आणि ख्रिश्चन परंपरेतील आशावादी दृष्टिकोन आणला. पृथ्वीवर मानवी जीवनात परिपूर्णता आणण्याच्या दिशेने इतिहासाची वाटचाल होत असते. ही भूमिका घेतली गेली.

प्रगती आणि उत्क्रांती यांच्या अर्थाबाबत अनुवंशिकतेने होणारी उत्क्रांती लक्षावधी वर्षात मोजावी लागते. माणसात लिखीत इतिहासाच्या प्रारंभापासून मोजता येण्याजोगा जैविक बदल झाल्याचे आढळत नाही. सामाजिक वारश्याने होणारी प्रगती काही पिढ्यांत मोजता येते. आपल्या मधल्या पिढ्यांचे अनुभव आत्मसात करून त्यांची अनुभवांच्या साठ्यात भर टाकत गेल्यामुळे त्याच्या बुध्दीची परिणामकारकता अनेक पटींनी वाढली आहे. जीवशास्त्रज्ञ उपार्जित गुणवैशिष्ट्यांचे संक्रमण नाकारतात. पण तोच सामाजिक प्रगतीचा पाया आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे उपर्जित कौशल्यांचे संक्रमण झाल्याने जी प्रगती साधली जाते, तिचे नाव इतिहास होय.

दुसरा मुद्दा असा की प्रगतीला निश्चित प्रारंभ आणि अंत असतो अशी कल्पना करणे योग्य होणार नाही.

इतिहास म्हणजे केवळ प्रगतीचा आलेख नाही तर प्रगतीचे शास्त्र आहे किंवा हवे तर असे म्हणा की घटनांचा प्रवाह आणि त्या घटनांचा आलेख अशा दोन्ही अर्थांनी इतिहास प्रगतीस्वरूप आहे.अक्टनचा सिध्दांत जो इतिहासातील स्वातंत्र्याच्या वाटचालीचे वर्णन करतो ते, इतिहास म्हणजे स्वातंत्र्याच्या दिशेने होणारी प्रगती आणि त्या प्रवाहाचा आलेख या अर्थाने इतिहास म्हणजे स्वातंत्र्याच्या आकलनात होणारी वाढ या दोन्ही प्रक्रिया एकमेकांबरोबर चालू असतात.

इतिहासकारांच्या दृष्टीने प्रगतीचा शेवट घडून आलेला नाही जसजशी वाटचाल होत असते तसतशी प्रगतीचे चिन्ह दिसत असतात. आपल्या ५००० वर्षांपूर्वीच्या पूर्वजापेक्षा आधुनिक माणसाचा मेंदू अधिक मोठा नाही तसेच त्याचे बुध्दीसामर्थ्यही अधिक नाही असे सांगितले जाते. पण आपल्या पिढ्यांचे अनुभव आत्मसात करून त्यांची अनुभवांच्या साठ्यात भर टाकत गेल्यामुळे परिणामकारकता अनेक पटींनी वाढली आहे. जीवशास्त्रज्ञ उपार्जित गुणवैशिष्ट्यांचे संक्रमण नाकारतात पण तोच सामाजिक प्रगतीचा पाया आहे. इतिहासाचा आशय अनुभव घेताघेताच उलगडत जातो.

तिसरा मुद्दा प्रगती बद्दल ती सरळ रेषेत नसते प्रगणीप्रमाणे परागतीचे कालखंड असतात. एक नियम सांगतांना ते म्हणतात की, जो लोकसमूह त्याला वर्ग, राष्ट्र, प्रदेश, संस्कृती पाहिजे ते नाव द्या, संस्कृतीच्या विकासात एका कालखंडाचे नेतृत्व करतो तो पुढील कालखंडात तशीच भूमिका बजावेल हे संभवनीय नसते. आणि त्याचे सबळ कारण हेच की तो समूह आधीच्या कालखंडातील परंपरा, हितसंबंध, आणि विचारधारा यांच्या इतका प्रभावाखाली असतो की पुढच्या काळातील परिस्थितीशी आणि अपेक्षांशी जमवून घेण्यास तो असमर्थ ठरतो. प्रगतीची कल्पना शाबूत ठेवायची असेल तर खंडीत रेषेची वस्तूस्थिती स्विकारली पाहिजे.

ऐतिहासिक क्रियांच्या बाबतीत प्रगतीचा अनिवार्य आशय कोणता या प्रश्नाकडे वळतांना सर इसाया बर्लीन यांच्या विधानाशी सहमती दर्शवतात ते की प्रगती आणि पुराणमतवाद या शब्दांचा कितीही दुरूपयोग झाला असला तरी त्या अर्थहीन संकल्पना नव्हेत. खरे पाहता दोन्ही घटक एकमेकांशी अतिशय निगडित आहेत आणि ते एकमेकांवर क्रिया प्रतिक्रिया करतात. मार्क्सच्या दृष्टीने मानवी श्रम हाच संपूर्ण संस्कृतीच्या इमारतीचा पाया असतो. आणि श्रमाची कल्पना पुरेशा व्यापक अर्थाने घेतली तर हे सूत्र मान्य करण्यास हरकत नाही. पण केवळ साधनसंपत्ती च्या संचयाने भागणार नाही. तर तंत्रज्ञान, सामाजिक ज्ञान, आणि अनुभव यांत वृध्दी झाली पाहिजे. विसाव्या शतकात समाजजीवनाची सुव्यवस्थित बांधणी करण्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सामाजिक जीवन सुनियंत्रित करण्यात काही प्रगती झाली आहे किंवा नाही? परागती झाली आहे की काय? तंत्रविज्ञानातील प्रगतीच्या तुलनेत माणूस एक सामाजिक प्राणी म्हणून उत्क्रांतीत मागे तर पडत नाही? असा प्रश्न विचारत याची कारणे काय याचा परामर्श घेतात.

आधुनिक राज्यसंस्थेचा उदय, भूमध्यसमूद्राकाठच्या प्रदेशाकडून युरोपकडे सत्ताकेंद्राचे स्थलांतर आणि फ्रेंच राज्यक्रांती चा काळ ही ठळक उदाहरणे होय. असे कालखंड हिंसक उठावाचे व. सत्तास्पर्धांचे असतात. जुने सत्ताधारी कमजोर होतात. संस्कृतीचे दिपस्तंभ कोसळून पडतात. महत्वाकांक्षेच्या आणि चिडीच्या भावनांनी भरलेल्या समाजगटांतील संघर्षातून नवी व्यवस्था उदय पावते.

समाज व्यवस्थेच्या समस्या यांचे आकलन आणि सामाजिक जीवनाची पुनर्रचना करण्याची तळमळ याचा आढावा घेत मानवाच्या ठिकाणी असणाऱ्या सुप्त सामर्थ्याच्या उत्तरोत्तर होत जाणाऱ्या विकासावरील श्रध्दा. प्रगती ही एक अमूर्त कल्पना आहे. आणि मानवजात ज्या मूर्त ध्येयांचा पिच्छा पुरवते ती ध्येये इतिहास प्रवाहात वेळोवेळी प्रकट होतात. त्यांचा उगम इतिहासाच्या बाहेर कुठे नसतो. माणूस पुर्णत्व प्राप्त करेल किंवा पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल अशा श्रध्दा नकाकरत या बाबतीत इतिहासात पूर्णत्वाची शक्यता नाकारणाऱ्या ईश्वरवाद्यांशी आणि गुढवाद्यांशी सहमत आहे असे म्हणत अमर्याद प्रगती शक्य आहे असे मत नोंदवतात. दुसरा मुद्दा हा आहे की प्रत्येक सुसंस्कृत समाज भावी पिढ्यांसाठी चालू पिढीवर त्याग करण्याची सक्ती करतो. त्याचे समर्थन निषेध होत असतो.

इतिहासातील वस्तूनिष्ठतेच्या निकट प्रश्न उपस्थित करत इतिहासासहीत सर्व सामाजिक शास्त्रे ज्ञाता आणि ज्ञेय यांना अलग मानणारा, निरीक्षक आणि निरीक्षण विषय यांच्यात स्पष्ट भेद कल्पिणारा ज्ञानाचा सिध्दांत होवू शकत नाही. या दोहोंत परस्परसंबंधाची आणि परस्परक्रियेची जी गुंतागुंतीची प्रक्रिया असते तिला न्याय देण्यासाठी आपल्याला एका नव्या प्रारूपाची गरज आहे. हे स्पष्ट करण्यासाठी, रशियन राज्यक्रांती निकोलसच्या मुर्खपणामुळे किंवा लेनिनच्या प्रभावशाली नेतृत्वामुळे झाली असे म्हणणे अपूरे आणि दिशाभूल करणारे होईल. पण ते पुर्णतः चुकीचे म्हणता येणार नाही. इतिहास कार अशी निरूपाधिक विधाने करत नाही.

वस्तुनिष्ठ तेचा पाया आणि निकष स्पष्ट करतांना ते अर्थपूर्ण तथ्ये, आगंतुक तथ्ये यातील फरक स्पष्ट करण्यासाठी रस्त्यावरील अपघाताचे उदाहरण दिले आहे. अर्थनिर्णय करतांना इतिहासकाराला अर्थपूर्णतेचा निकष ठरवावा लागतो. आणि त्यांच्या आधारे तो अर्थपूर्ण आणि आगंतुक असा भेद करतो. इतिहासाच्या बाबतीत बदल हेच एक तत्व आहे. असे प्रो.बटरफिल्ड म्हणतात.

हेगेलने आपल्या केवल तत्वाला विश्वचेतनाचे गूढ स्वरूप दिले आणि इतिहासप्रवासाचा शेवट भविष्य काळात पाहण्याऐवजी वर्तमानकाळात पाहण्याचा प्रमाद घडला. नंतर टॉकव्हिल हे त्यांच्याच काळातील विकास पावणारे समानतेचे तत्व ही एक सार्वत्रिक आणि कायमस्वरूपी बाब आहे हे सांगून ते पुढे म्हणतात. समानतेचा क्रमाने आणि सावकाश होत जाणारा विकास म्हणजेच आपला भूतकाळातील व भविष्यकाळातील इतिहास. वर्तमानकाळातील लोकांना जर हे पटवून देता आले तर ते एकच ज्ञान त्या विकासाच्या कल्पनेला ईश्वरेच्छेचे पावित्र्य मिळवून देण्यास पुरेसे आहे. पुढे नेमियर आणि मार्क्स यांचाही विचार करून एक इतिहासकार दुसऱ्या पेक्षा अधिक वस्तुनिष्ठ आहे म्हणजे काय हे उघड करतांना त्याची तथ्यांची अचूक निवड असते.तसेच त्याच्या समाजातील व इतिहासातील स्थानामुळे त्याच्यावर पडणाऱ्या मर्यादा ओलांडण्याची क्षमता त्यांच्यात असते तसेच ही क्षमता अंशतः त्या स्थानामुळे समाजात होणाऱ्या गुंतवणुकीची व्याप्ती ओळखण्यात किंवा वेगळ्या शब्दात पूर्ण वस्तुनिष्ठतेची अशक्यता ओळखण्यात असते. दुसरा प्रश्न हा की नजिकच्या परिसरामुळे ज्यांचा दृष्टीकोन मर्यादित झालेला असतो अशा इतिहासकारांपेक्षा त्याची भविष्यकाळाचा वेध घेण्याची क्षमता वेगळ्या प्रकारची असते. ती भूतकाळासंबंधीचे अधिक चिरस्थायी स्वरूपाचे आणि अधिक प्रगल्भ आकलन करून घेवू शकतो. भूतकाळ आकलन करून घेणाऱ्या इतिहासकाराला भविष्यकाळ समजून घेण्याच्या प्रयत्नात वस्तुनिष्ठता साध्य करणे शक्य असते.

इतिहास म्हणजे भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांच्यातील संवाद असे म्हटले तेव्हा हा संवाद भूतकाळातील घटना आणि क्रमांने उलगडत जाणाऱ्या भविष्यकालीन उद्दीष्टां मधील असतो.इतिहास काराची भूतकाळाची मिमांसा तसेच त्याची अर्थपूर्ण आणि संबंधित घटनांची निवड ही क्रमाने स्पष्ट होत जाणाऱ्या उद्दिष्टांबरोबर उत्कांत होत असते.

जोवर राजकीय हक्कांची प्राप्ती हे उद्दिष्ट होते तेव्हा इतिहासकारांनी भूतकाळांची मिमांसा घटनात्मक आणि राजकीय परिभाषेत केली. जेव्हा आर्थिक व सामाजिक साध्यांनी घटनात्मक आणि राजकीय साध्यांची जागा घेतली तेव्हा इतिहासकार आर्थिक आणि सामाजिक मिमांसेकडे वळले. मानवी विकासात आर्थिक व सामाजिक साध्ये साधण्याची धडपड राजकीय आणि घटनात्मक साध्ये साधण्यापेक्षा अधिक प्रगत व व्यापक स्वरूपाची असल्याने इतिहासाची सामाजिक आणि आर्थिक मिमांसा राजकिय मिमांसेपेक्षा वरची पायरी मानली पाहिजे हे मत व्यक्त करतात.

जुनी मिमांसा टाकावू ठरत नाही तर तिला पोटात घेऊन पुढे जावे लागते. इतिहास लेखन शास्त्र हे एक विकासक्षम शास्त्र आहे ते या अर्थाने की ते स्वत विकासक्षम असलेल्या घटनाप्रवाहाकडे पाहण्याची व्यापक आणि प्रगल्भ दृष्टी देते.

गटे यांच्या मते, ऱ्हास काळात आत्मनिष्ठ वृत्ती बळावतात, याउलट जेव्हा नव्या युगाची चाहूल लागते तेव्हा वस्तुनिष्ठ प्रवृत्ती प्रचलित होतात'.

ऐतिहासिक निर्णयाची कसोटी भविष्यकालाधिष्ठित मानणाऱ्या कोणत्याही सिध्दांतावर लोकांकडून काही आक्षेप घेतले जातात त्यांची चर्चा करतांना ते म्हणतात की यश ही निर्णयाची अंतीम कसोटी मानतो तरी जे घडेल ते युक्त मानतो. मानवजात वाईटाकडून चांगल्याकडे, खालच्या पातळीवरून वरच्या पातळीकडे, मार्गक्रमण करीत आहे असे मानले नाही तर इष्टही ठरवले.

याच प्रश्नावर विविध इतिहासकार काय मते मांडली आहे याचा आढावा घेतला आहे गिबन यांच्या रोमच्या साम्राजावरील ग्रंथावरून एक समर्थन केले आहे की इतिहास हा माणसांच्या हातून जे घडले त्याचा आलेख आहे, जे घडले नाही त्याचा नाही. प्रो. टोनी म्हणतात की इतिहास कार अस्तित्वात असलेली व्यवस्था अपरिहार्य आहे असा आभास निर्माण करतात. त्यासाठी ते ज्या शक्ती विजयी झाल्या त्यांना प्रमुख स्थान देतात. आणि भक्ष्यस्थानी पडल्या त्यांना दुय्यम स्थान देतात.म्हणून ते म्हणतात की इतिहासकाराने विरोधी शक्तींना कमी लेखता कामा नये. विजयी शक्तींना विजयासाठी जर अटीतटींचा संघर्ष करावा लागला असेल तर तो सहजसाध्य होता हे दाखवता कामा नये.

हेगेल यांचे वाक्य जे समाज राज्यसंस्था निर्माण करतात, त्यांचीच आम्ही दखल घेतो. या विधानात इतिहास काळ आणि इतिहास पूर्वकाळ यामधील भेद यांचे प्रतिबिंब पडले आहे. ऐतिहासिकतेचा निकष चर्चा करतात ती अशी की एका युगात योग्य असते ते दुसऱ्या युगात असंस्कृत ठरते.धिक्कारार्ध ठरते. यासाठी ते इसाया बर्लीन यांच्या एका व्याख्यानात बिस्मार्क यांच्या नैतिक उणिवा लक्षात घेऊन देखील प्रशस्ती केली होती कारण त्यांच्या म्हणण्यानुसार बिस्मार्कला त्याच्या परिस्थितीचे आकलन झाले होते. तात्पर्य एवढेच की इतिहासातील निर्णयाची कसोटी एखादे सार्वत्रिक प्रामण्याचा दावा करणारे तत्व ही नसून सर्वात अधिक व्यवहार्य ही असते.

इतिहासाच्या अन्वयार्थाच्या प्रकाशात जे राजकिय निर्णय घेतो ते तडजोडी वर आधारित असतात पण आपला इतिहासाचा अन्वयार्थ अशाच तडजोडीवर आधारित असतो.हा मुद्दा

मांडत परत एकदा सार्वत्रिक व्यवहाराकडे वळतात या कसोटीचे उपयोजन सोपे किंवा आपोआप घडणारे नसते ती धडाधड निष्कर्ष काढायला मदत करत नाही तर युक्त दृष्टीकोन मंजूर करत नाही इतिहास विलंबाने साध्यसिध्दी जाणतो.यासाठी परत बिस्मार्कचे उदाहरण देतात. वस्तूनिष्ठ निर्णयाच्या बाबतीत १९२० च्या दशकांतील इतिहासकार १८८० च्या इतिहासकारापेक्षा अधिक बरोबर होता . आणि आजचा त्याहून बरोबर ठरू शकतो. वस्तूनिष्ठता ही एखाद्या वर्तमानकालीन स्थीर आणि अपिरिवर्तनीय निर्णयाच्या प्रमाण दंडकावर आधारता येत नाही. तर ती भविष्यकाळाच्या संदर्भात ठरवावी लागते. आणि इतिहासाच्या वाटचालीबरोबर उत्क्रांत होत जाते. इतिहास, भूतकाळ आणि भविष्यकाळ यांच्यात सुसंगत संबंध प्रस्थापित करतो तेव्हाच त्याला अर्थ आणि वस्तूनिष्ठता प्राप्त होते.

तथ्य आणि मूल्य यावर परत येऊन तथ्यांपासून मूल्ये निष्पन्न करता येत नाही. हे बरोबर तसेच चूक ही मानतात. स्वातंत्र्य, समता, न्याय अशा मूल्यवाचक शब्दांच्या ऐतिहासिक आशयात कसा बदल होतो. ते सांगून नैतिक मूल्यांची प्रसारात गुंतलेल्या धार्मिक संस्थांची उदाहरणे देतात. आपल्या जवळ जगण्यासाठी जी साधनसामग्री असते तिचा आपली मूल्ये हा आवश्यक भाग असतो. आणि त्यांच्या आधारे सभोवतालीच्या परिस्थितीशी जुळवून घेत असतो. ती अनुकूल, करून स्वामित्व मिळवता येते. या सर्व गोष्टींनी इतिहास हा एक प्रगतीचा आलेख बनलेला आहे. इतिहासातील प्रगती तथ्ये आणि मूल्य यांच्या परस्पर अवलंबून आणि परस्पर क्रियेतून साध्य होते. वस्तूनिष्ठ इतिहासकार तो जो की या अन्योन्य प्रक्रियेचा जास्तीत जास्त सूक्ष्म वेध घेऊ शकतो.

सत्य या शब्दाच्या रोजच्या जीवनातील उपयोग करतो त्यावरून तथ्ये आणि मूल्य यांच्या समस्येची उकल करता येते. या शब्दाचा अर्थ विविध भाषेत कसा अनिवार्य आहे हे सांगून इतिहासाला तथ्य आणि अन्वयार्थ, तथ्य आणि मूल्य, यांचा तोल सांभाळावा लागतो. आणि ती अलग करता येत नाही.शक्य आहे की गतीमान जगात तथ्य आणि मूल्य यांची फारकत घेणे भाग पडेल पण गतीहीन जगात इतिहास अर्थहीन ठरेल. बदल, गती, या शब्दात प्रगती हे इतिहासाचे सारतत्व आहे.

निष्कर्ष काढतांना ॲक्टन यांच्या प्रगतीतील वर्णनाकडे वळतात. प्रगती म्हणजे ज्या वर इतिहास लेखन आधारलेले असते, असे शास्त्रीय गृहीत प्रमेय, तुम्हाला हवे ते स्वरुप देवू शकता इतिहासबाह्य आणि महाबुध्दीवान शक्तींवर अवलंबून ठेवून ईशाविज्ञान, अर्थहीन

कथा, दंतकथा यांचा वाङ्मयीन ग्रंथ. इतिहास विषयक दृष्टीकोन आपला समाजविषयक दृष्टीकोन प्रतिबिंबित करतो आणि समाजाच्या भवितव्यावरील आणि इतिहासाच्या भवितव्यावरील श्रध्दा जपत समारोप केला.

**6 विस्तारणारे क्षितीज**

इतिहासाची संकल्पना, की इतिहास ही एक गतीमान प्रक्रिया आहे. आणि इतिहासकार त्या गतीमान प्रक्रियेचा भाग आहे.अशी सुरवात करून शेवटच्या प्रकरणात आजच्या काळात इतिहास आणि इतिहासकार यांचे स्थान काय यांबद्दल विचार व्यक्त केले आहे.समाजाच्या वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांची चर्चा करतात.

पंधराव्या सोळाव्या शतकात आधुनिक जगाचा पाया घातला गेला तेव्हापासून झालेले बदल सखोल आणि दूरगामी होते हे बदल वैज्ञानिक शोध, त्यांचे अधिक व्यापक प्रमाणावर उपयोजन आणि प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे साधलेली प्रगती यांच्या परिणाम घडून आले. सर्वात महत्वाच्या जाणवणारा पैलू म्हणजे सामाजिक क्रांती घडून आली. या क्रांतीमुळे वित्त, व्यापार, आणि नंतरच्या उद्योगाच्या आधारावर एक नवा वर्ग निर्माण झाला. तसेच नव्या सामाजिक आणि औद्योगिक संरचनेमुळे ज्या समस्या निर्माण झाल्या त्या पण अफाट आहे. या बदलांचे दोन पैलू आहेत. हे पैलू मूलगामी आणि भौगोलिक व्याप्तीही मोठी आहे.

घटनांमध्ये प्रभाव टाकणे आणि सहभागी होतात तेव्हा इतिहास सुरू होतो. बर्कहार्ड म्हणतात की, इतिहास म्हणजे जाणिवेच्या जागृतीमुळे निसर्गाशी घडून आलेली फारकत. माणूस केवळ आपल्या परिसराला नव्हे तर स्वत:ला समजावून घेवून स्वत:वर क्रिया करण्यासाठी धडपडत असतो. आणि त्यामुळे त्याच्या बुध्दीसामर्थ्याला तसेच इतिहासाला नवी परिमाणे लाभली आहेत.सध्याचे युग हे इतिहासाचे सर्वाधिक भान असलेले युग आहे. भूत, वर्तमान आणि भविष्य हे जिला शेवटचे टोक नाही अशा इतिहासाच्या साखळीतले दुवे आहेत.

आत्मजाणिवेचा विकास हा आधुनिक काळातील महत्वाचा बदल आहे. माणूस प्राणी हा विचार करू शकतो इतकेच नव्हे तर स्वतच्या विचार प्रक्रियेचा विचार करू शकतो.एकाच वेळी निरीक्षण आणि विविध करू शकतो. इथपर्यंत झालेल्या प्रवासाचा आढावा घेतांना आधीच्या विचारवंतांनी कशा पायऱ्या होत्या यात रूसो माणसाला आत्मबोधाची आणि आत्मजाणिवेचे मार्गतर डी. टॉकव्हिल यांचे फ्रेच राज्यक्रांती बद्दल ,"

माणसाने समाज व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आपल्या बुद्धीने आणि निसर्ग नियमांच्या मदतीने साधे सोपे प्राथमिक नियम तयार केले पाहिजे.हे नियम गुंतागुंतीच्या परंपरागत रूढींची जागा घेतील."

नंतर ॲक्टन आपल्या टिपणात माणसांनी फ्रेंच राज्यक्रांती पर्येत कधीही जाणिवपूर्वक स्वातंत्र्य प्राप्तीसाठी धडपड केली नव्हती. हेगेल, लिंकन यांच्या फ्रेंच राज्यक्रांती बद्दल चर्चा करतज्ञ अठराव्या शतकात माणूस भोवतालच्या विश्व आणि त्यांचे नियम याबाबत जागरूक बनला होता. अठराव्या शतकापासून आधुनिक जगापर्यंत संक्रमण सावकाश आणि दिर्घ कालावधीनंतर घडून आले. हेगेल आणि मार्क्स हे त्याचे प्रातिनिधिक तत्वज्ञ होते. दोघांचीही भूमिका द्विधाभावी होती. हेगेलने ईश्वरी नियमांचे विवेक शक्तीच्या नियमांत रूपांतर केले आणि तोच त्याच्या तत्वज्ञानाचा मूलाधार होता. हेगेलचा विश्वचेतन एकीकडून ईश्वर व दुसरीकडून विवेकशक्ती या दोहोंना घट्टपणे कवेत घेतो. ऐतिहासिक बदल आणि माणसाच्या आत्मजाणिवेचा विकास यांच्यात वास्तवाचा गाभा पाहणारा पहिला तत्वज्ञ होय. हेगेलने सांकेतिक चिन्ह पुरवले पण व्यावहारिक अर्थ देणे जमले नाही. या बिजगणिती समिकरणात अंकगणितातील किमती भरण्याचे काम मार्क्सवर येवून पडले.

मार्क्सच्या अंतीम संश्लेषणात इतिहासाला तीन अर्थ प्राप्त झाले. ते एकमेकांपासून वेगळे मानता येणार नाही तर तिन्ही मिळून एक तार्किक व्यूह तयार होतो. मुख्यतः आर्थिक स्वरूपाच्या वस्तुनिष्ठ नियमानुसार घडून येणाऱ्या घटना, त्यांना समांतर असा द्वंद्वात्मक पध्दतीने होणारा विचारांचा विकास, आणि त्यांना समांतर अशी कृती, जी वर्ग लढ्याच्या रूपात क्रांतीचे तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आणते. आपल्या सिध्दांत मध्ये वस्तगत नियम आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी जाणिवपूर्वक कृती यांचे विश्लेषण केले. माणसे ज्या नियमांनी बध्द असतात. पण ज्यांची जाणिव नसते. भांडवली अर्थपध्दतीत आणि समाजव्यवस्थेत गुरफटलेल्या माणसांच्या भ्रामक जाणिवांकडे अनेकदा लक्ष वेधले. ' उत्पादनाच्या आणि वितरणाच्या व्यवहारात गुंतलेल्या व्यक्तीच्या मनात उत्पादनाच्या नियमांसंबंधी ज्या कल्पना असतात,ज्या खऱ्या नियमांहून वेगळ्या असतात'.

मार्क्सच्या लिखाणावर आणि उत्पादन आणि राज्यसंस्था यावरील चर्चा करत ते पुढे तत्वज्ञान या संकल्पनेबाबत बोलतात. मार्क्सच्या मते तत्वज्ञान ही एक नकारात्मक संज्ञा आहे. ती भ़ांडवलशाही व्यवस्थेतील भ्रामक जाणिवेचे फलित असते. लेनिन च्या विचारात

तत्वज्ञान ही सकारात्मक आणि तटस्थ आहे. तिचे स्वरूप वर्गीय जाणीव असलेल्या निवडक नेत्यांनी ज्यांची वर्गीय जाणीव सुप्तावस्थेत आहे अशा अफाट कामगारवर्गात रूजवलेल्या श्रध्देचे आहे. वर्गीय जाणीव ही एक आपोआप घडणारी प्रक्रिया नसून ती घडवून आणावी लागते.

विवेकशक्तीबद्दल नवे परिमाण देणाऱ्या विचारवंत फ्राईड बद्दल बोलताना एक अनाकलनीय व्यक्तीमत्व म्हणतात तसेच एकोणिसाव्या शतकातील प्रातिनिधिक उदारमतवादी आणि व्यक्तीवादी वाटतो. व्यक्ती आणि समाज यांच्या तील द्वंद्वांची त्या काळात प्रचलीत असलेली भ्रामक संकल्पना स्विकारली होती. फ्राईडने माणसाचा एक सामाजिक नव्हे तर जीवशास्त्रीय प्राणी म्हणून विचार केला. सामाजिक पर्यावरण ही एक स्वत: माणसांकडून सतत निर्मिली जाणारी आणि रूपांतरित हहोत जाणारी प्रक्रिया नसून इतिहासदत्त बाब आहे असे त्यांनी मानले.

हीच तुलना मार्क्सवाद्यांशी करत फ्राईडने जगाला मानवी वर्तनातील विवेकविसंगत घटकांची जाणिव करुन दिली. मानवी वर्तनाच्या अबोध अशा स्रोतांची जाणिव करुन दिली. आणि त्यांच्या बुध्दीगम्य अन्वेषणाचा मार्ग खुला करून ज्ञानाच्या आणि आकलनाच्या कक्षा वाढवल्या. त्यामुळे विवेकशक्तीची व्याप्ती वाढली आणि माणसाचे स्वत: बद्दलच्या आकलनाचे व स्वत:वरील आणि परिसरावरील स्वामित्वाचे सामर्थ्य वाढले. ही कामगिरी क्रांती आणि प्रगतीच्या स्वरूपाची आहे. आणि याबाबत फ्राईडचे कार्य मार्क्सच्या कार्याला पूरक आहे. विरोधी नाही.

इतिहासकारांच्या दृष्टीने फ्राईडचे कर्य दोन कारणांसाठी महत्त्वाचे आहे ते हे की माणसे जी कृत्ये करतात त्यांच्या हेतूबद्दल त्यांच्या ज्या स्वत:च्या कल्पना असतात त्या त्यांच्या हेतूंच्या स्पष्टीकरणासाठी पुरेशा असतात. ही जुनी भ्रामक समजूत फ्राईडनी जमीनदोस्त केली. दुसरा मुद्दा हा की मार्क्सच्या विचारांना पाठबळ देणाऱ्या फ्राईडने इतिहासकाराला आत्मपरिक्षण करण्यास प्रवृत्त केले.यात पुढील गोष्टी येतात त्या ह्या की, त्याचे स्वत:चे इतिहासातील स्थान, त्याची अभ्यासाविषयक आणि कालखंडाची निवड, आणि घटनांची मिमांसा त्याच्या पाठीमागे असलेल्या बहुतेक सुप्त स्वरूपात असलेल्या प्रेरणा,त्याचा दृष्टीकोन निश्चित करणारी राष्ट्रीय आणि सामाजिक पार्श्वभूमी, त्याची भूतकाळाविषयी कल्पनांना आकार देणारी भविष्यकाळाविषयीची संकल्पना.

मार्क्स आणि फ्राईड यांनी जे लिखाण केले त्यामुळे इतिहासकार ही बाहेरची व्यक्ती नाही हे भान आले. इतिहास काराला आपण काय करतो आहोत याचे ज्ञान असले पाहिजे.

समकालीन जगात विवेकशक्तीचे कार्य आणि सामर्थ्य यांचा नवनव्या क्षेत्रात विस्तार होत आहे आणि ज्या क्रांतीकारी परिवर्तनातून विसावे शतक जात आहे त्या संक्रमणाच्या प्रमुख लक्षणांची चिकित्सा पुढे करतात. सुरवातीला अर्थशास्त्रापासून माणसांच्या आणि देशांच्या आर्थिक वर्तनव्यवहाराचे नियमन करणाऱ्या वस्तूनिष्ठ नियमांवरील श्रद्धा १९२४ पर्यत अबाधित होती. आणि त्याचे उल्लंघन करणे अहिताचे मानले जाई.

व्यापारी चक्रे, किमतीतील चढ-उतार, बेरोजगारी या गोष्टी त्या नियमांनी निश्चित होतात अशी समजूत होती. त्यानंतरचे दृष्टीकोन कसे बदलत गेले? अर्थशास्त्र म्हणजे एकतर सैध्दांतीक गणिती समीकरणांची श्रेणी असते. किंवा काही लोक इतरांना आपल्या मार्गातून बाहेर कसे ढकलतात याचे व्यवहारीक शास्त्र असते. भांडवलशाहीचे व्यक्तीप्रधान अवस्थेकडून महाकाय अवस्थेकडे जे संक्रमण घडून आले त्यामुळे मुख्यत: हा बदल घडून आला. आर्थिक व्यवहारात एकटे भांडवलदार आणि व्यापारी यांचे वर्चस्व होते तोपर्यंत त्यावर कुणाचेच नियंत्रण नव्हते म्हणून व्यक्तीनिरपेक्ष नियम आणि प्रक्रिया यांच्याबद्दल भ्रम टिकून होता. पण जेव्हा मुक्त अर्थव्यवस्थेकडून नियंत्रित अर्थव्यवस्थेकडे संक्रमण घडून आले तेव्हा हा भ्रम दूर झाला. मग ती भांडवलशाही अर्थव्यवस्था असो की समाजवादी असो. प्रत्येकाला माहित असते की मंदी आणि बेरोजगारी मानवनिर्मित असतात.ज्याप्रमाणे मुक्त व्यवस्थेपासून नियोजनापर्यत संक्रमण घडून आले आहे त्याप्रमाणे जाणिवेच्या अभावाकडून आत्मजाणिवेकडे आणि वस्तूनिष्ठ नियमांवरील श्रध्देकडून आपल्या आर्थिक भवित्याकचे आपण स्वामी होवू शकतो यावरील श्रध्देकडेही संक्रमण घडून आले आहे. सामाजिक धोरण आणि आर्थिक धोरण हातात हात घालून वाटचाल करीत आहे हा अत्यंत महत्त्वाचा विचार मांडला आहे. केंब्रिज मॉडर्न हिस्टरी मधील लेखक एस. लीड्ज य़ांचा उतारा देतात तो असा की, समाज सुधारणा जाणीवपूर्वक प्रयत्नाने घडवता येते. ही श्रध्दा आजच्या युरोपीय मनाचे प्रमुख लक्षण आहे. या श्रध्देने सर्व समस्यांचे स्वातंत्र्य हे एकच एक उत्तर या श्रध्देची जागा घेतली आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळातील मानवी हक्कांवरील श्रध्देइतकाच या श्रध्देचा आज दिसून येणारा प्रभाव महत्वाचा आणि अर्थपूर्ण आहे.

माणसाच्या नियंत्रणाबाहेरील पण विवेकसंगत व वस्तुनिष्ठ आर्थिक नियम शिरसावंद्य मानले जात. पण आज आपण कसे मानतो की माणसाच्या ठिकाणी जाणिवपूर्वक कृतीने आर्थिक नियती आपल्या नियंत्रणाखाली आणण्याची क्षमता आहे. हे जे संक्रमण घडून आले आहे.ते माझ्या मते प्रगतीचे निदर्शक आहे. ही प्रगती विवेकशक्तीचे मानवी व्यवहारात उपयोजन करण्याच्या बाबतीत आहे. तशीच स्वत:ला समजावून घेवून स्वत:वर आणि परिसरावर स्वामित्व मिळवण्याच्या वाढत्या क्षमतेच्या बाबतीत आहे. विज्ञानदेखील निसर्ग विषयीचे वस्तूगत नियम शोधून काढणे हे आपले काम आहे असे समजत नाही. त्यापेक्षा निसर्गाला आपल्या दावणीला बांधून परिसराचे स्वरूप बदलण्यासाठी कामचलाऊ सिध्दांत तयार करणे हे आपले काम आहे असे विज्ञान मानते. माणसाने आपल्या विवेकशक्तीचा जाणिवपूर्वक उपयोग करून केवळ आपल्या परिसरातच नव्हे तर स्वत: मध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी सुरूवात केली. याचे उदाहरण म्हणजे लोकसंख्येचे नियंत्रण हे विवेकपूर्वक आणि जाणीवपूर्वक आचरणात आणण्याचे धोरण झाले तसेच मानवी प्रयत्नांनी माणसाची आयुमर्यादा वाढवता येते आणि लोकसंख्येतील पिढ्यांचा तोल बदलता येतो. तसेच मानवी वर्तनावर परिणाम घडवून, मानवी स्वभावात बदल घडवून आणण्यासाठी केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियांबद्दल ऐकले आहे. माणूस आणि समाज दोन्ही बदलत आहेत. सर्व स्तरातील शिक्षक समाजाला एक विशिष्ट आकार देण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करण्यात आणि त्या समाजाला अनुरुप असे दृष्टीकोन, निष्ठा आणि मते उगवत्या पिढीमध्ये रूजवण्यात गुंतले आहेत. शैक्षणिक धोरण हे विवेकाधिष्ठित आणि नियोजनबध्द सामाजिक धोरणाचा अविभाज्य भाग आहे. विवेकशक्तीच्या मदतीने जेव्हा मानवाचा अभ्यास केला जातो तेव्हा त्याचा शास्त्रीय हेतू केवळ संशोधन नसून माणसाचे परिवर्तन असतो.

आपल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवहाराच्या व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणण्याचे सामर्थ्य आपल्या ठायी आहे याची माणसाला झालेली जाणिव हीच विसाव्या शतकातील क्रांतीची मोठी बाजू आहे असे म्हणत ते दुसऱ्या मुद्द्याकडे वळतात.

विवेकशक्तीच्या क्षेत्राचा विस्तार हा वैयक्तिकतेच्या त्या प्रक्रियेचा केवळ एक भाग आहे. ही प्रक्रिया म्हणजे वैयक्तिक कौशल्ये, व्यवसाय आणि संधी यातील विविधता ती प्रगतीपथावरील संस्कृतीचे अंग असते. औद्योगिक क्रांतीचा सर्वाधिक सामाजिक परिणाम हा होता की त्यामुळे विचार करायला शिकणाऱ्यांच्या आणि बुध्दीचा वापर करणाऱ्यांच्या

संख्येत क्रमाने वाढ होत गेली. इतर देशांच्या तुलनेत आणि प्रगत देशात होणाऱ्या प्रगतीची तुलना करतांना एकूण सर्वत्रच तंत्रवैज्ञानिक विकासाची गती वाढू लागली तेव्हा ही बाब महत्त्वाची झाली कारण सामाजिक क्रांती, तंत्रवैज्ञानिक क्रांती आणि वैज्ञानिक क्रांती तिन्ही एकाच प्रक्रियेचे भाग आहेत. परत एकदा रशीयन राज्यक्रांती आणि त्याविषयी उदाहरणे देत उत्पादनाच्या शास्त्रीय संघटनेत कितीतरी अधिक महत्त्वाचे अंतर्भूत असते. विवेकशक्तियुक्त माणूस होय.

विवेकशक्तीकडे समकालीन जगात जे कार्य सोपवले गेले आहे त्याच्या संशयास्पद बाजूंची आणि त्यातील धोक्यांची या ठिकाणी दखल घेतली पाहिजे. शिक्षण हे वैयक्तिक क्षमता व संधी आणि म्हणून वैयक्तितता वाढवण्याचे एक आवश्यक आणि प्रभावी हत्यार आहे.पण ते सामाजिक सर्वसमानता निर्माण करण्यासाठी हितसंबंधी गटांच्या हातातील हत्यारदेखील झाले आहे.

प्रसारमाध्यमे अनेकदा ही आवाहने करतांना दिसतात पण हीच माध्यमे व्यापारी क्षेत्रांतील जाहिरातदार आणि राजकीय प्रचारक ही या धोक्याची दुसरी उदाहरणे होत. विवेकशक्तीचा उपयोग संशोधनासाठी नव्हे तर विधायक कामासाठी तसेच स्थितीशिलतेने नव्हे तर गतिशीलतेने केला जातो आणि व्यावसायिक जाहीरातदार आणि मोहिमांचे संचालक विद्यमान वस्तुस्थिती विचारात घेत नाही अशी टिप्पणी करतात.

आपल्या आरोपाला दोन उत्तरे आहे असे सांगून पहिले इतिहास काळातील प्रत्येक शोधाला किंवा नव्या तंत्राला नकारात्मक तशीच सकारात्मक बाजू असल्याचे आढळेल, प्रत्येक नविन शोधाचे उदाहरणे देतात. छपाई, मोटार, अणुऊर्जा इ. कोणालातरी त्याची किंमत मोजावी लागते.या घटना समाजात विवेकशक्ती आणि लोकशाही तील धोके इतिहास यांची चर्चा करत दुसरा पैलू म्हणजे जगाचे बदललेले रूप होय हा मांडतात.मध्ययुग कोसळल्यावर आधुनिक युगाचा पाया घातला गेला आणि मग भुमध्यसमुद्राकाठच्या प्रदेशांकडून अटलांटिक महासागराच्या काठावरील प्रदेशांकडे जे बदल झाले त्याचा आढावा घेत आशिया खंडातील काय घडले याचा विचार केला आहे.१९०२ मधील इंग्लंड आणि जपान यांच्यातील करारापासून सुरू होते. आशियातील एका देशाला युरोपिय महासत्तेच्या खास वर्तुळात प्रवेश मिळाला.१९०५ च्या रशियन क्रांतीचे प्रतिध्वनी आशियात उमटले. पर्शिया, तुर्कस्तान, आणि चीन मध्ये क्रांत्या झाल्या. आशियातील अनेक देशांत औद्योगिक विकासाला चालना मिळाली. चीनमध्ये परकिय

विरोधी भावना आणि भारतात राष्ट्रवादाला प्रोत्साहन मिळाले व अरब राष्ट्रवादाचा जन्म झाला.

आशिया आफ्रिकेतील लक्षावधी जनतेमध्ये आधुनिक तंत्रवैज्ञानिक आणि औद्योगिक प्रक्रियांच्या प्रसारामुळे आणि राजकीय जाणिवांच्या उदयामुळे त्या खंडाचा चेहरामोहरा बदलत आहे.या बदलांचे एकंदर सगळीकडे पडसाद उमटले आहे.

विसाव्या शतकातील क्रांतीत विवेकशक्तीच्या व्याप्तीचा जो विस्तार घडून आले आहेत त्याचे इतिहास काराच्या दृष्टीने विशिष्ट परिणाम घडून आले आहे. कारण विवेकशक्तीच्या व्याप्तीचा विस्तार म्हणजे मुलार्थाने आजवर इतिहासाच्या बाहेर असलेल्या गटांचा आणि वर्गांचा, राष्ट्रांचा आणि खंडांचा इतिहासात प्रवेश होय. मध्ययुगाच्या इतिहासकारांची मध्ययुगीन समाजाकडे धर्माच्याज्ञदृष्टीकोनातून पाहण्याची वृत्ती होती. तिला त्यांच्या हाती असलेली वेचक साधने जबाबदार होती. यासाठी धर्मसंस्थांचे उदाहरण देत तीच ऐतिहासिक संस्था होती. समाजाचे ऐहीक जीवन धर्मसंस्थेकडून घडवले जात होते आणि संघटीत केले जात होते. समाजाला स्वतचे असे वेगळे सुसंघटित जीवन नव्हते. इतिहासपुर्व काळातील लोकसमूहांप्रमाणे त्या काळातील लोक इतिहासापेक्षा निसर्गाचा भाग होते. जेव्हा अधिकाधिक लोकांच्यात सामाजिक आणि राजकीय जाणिवांचा उदय होतो व आपण भूतकाळ आणि भविष्यकाळ असणारे ऐतिहासिक लोकसमूह आहोत अशी त्यांच्यातील वेगवेगळ्या गटांना जाणिव होते. तेव्हा ते इतिहासात पूर्णतः प्रवेश करतात.आणि तेव्हाच इतिहास सुरू होतो.

इतिहासाच्या संकल्पनेत घडून आलेली ही एक क्रांती आहे. अठराव्या शतकात इतिहास हा अद्यपि अभिजनांचा इतिहास होता. एकोणिसाव्या शतकात ब्रिटिश इतिहासकारांनी इतिहास म्हणजे एका संपूर्ण राष्ट्रीय जातीचा इतिहास हा दृष्टिकोन चाचपडत, अडखळत स्विकारला.आपल्या १८९६ च्या अहवालात जागतिक इतिहास हा सर्व देशांच्या एकत्रित इतिहासापेक्षा भिन्न असतो हे सांगून ऑक्टन म्हटले की जागतिक इतिहासात त्या त्या राष्ट्रांचा वेगळा असा इतिहास सांगितला जाणार नाही एका अधिक व्यापक इतिहासात त्यांच्या इतिहासाचे स्थान दुय्यम राहिल. ते स्थान ती राष्ट्रे मानवजातीच्या विधीलिखितात किती काळ आणि किती प्रमाणात आपला हिस्सा उचलतात यावरून ठरेल". त्यांना अभिप्रेत आहे की त्यांनी संकल्पिलेला जगाचा इतिहास हा कोणत्याही विचारी इतिहासाचा विषय असतो.

गेल्या चाळीस वर्षात अमेरिकेच्या इतिहासाला भरपूर जागा दिली हे महत्त्वाचे पाऊल आसले तरी एक धोका आहे तो म्हणजे आपल्या अभ्यासक्रमावर इंग्लंडच्या इतिहासाचा बोजा आहे आणि त्याला जागतिक इतिहासात मध्यवर्ती स्थान दिल्याने बाकीचे प्रदेश परिघावर ठेवणे विकृतीकरण होईल.ही बाब विद्यापीठाच्या बाबतीत बोलतांना स्पष्ट करतात.चीन किंवा पर्शियासारख्या देशांचा महत्वाचा इतिहास उपलब्ध आहे. पण त्याबाबत युरोपने ते देश अंकित करण्याचा प्रयत्न केल्यावर तिथे काय घडले याबाबत केंब्रिज विद्यापीठात दाखल घेतली जात नाही याबाबत खंत व्यक्त करतात अन्यदेशात किंवा खंडातील लोक समजून घेण्याच्या असमर्थतेमुळे जगात काय घडते यापासून अलिप्त ठेवण्याबाबत खंत व्यक्त करतात आणि समारोप करतांना अक्टन यांच्या हयातीत वेगवेगळ्या काळातील त्यांच्या विचारांचा मागोवा घेताना उदारमतवादी आणि पुराणमतवादी, आधुनिक कल्पनांचा उदय, क्रांती, वर्तमानकाळात उदारमतवाद हा पुराणमतवादाच्या रूपात उरला आहे, आजच्या काळातील विचारवंतांपेक्षा त्यांचे भिन्न विचार कसे आहेत ह्याची तुलना करतात. तिसरी गोष्ट ही की त्यांच्या विचारांतील कोणते घटक आजही प्रमाण ठरू शकतील याची तपासणी करावी लागेल.

आधीच्या पिढीजवळच्या दोन गोष्टी अशा होत्या की ज्याची नितांत गरज आहे ती म्हणजे: बदल हा इतिहासाचा प्रगतीकारक घटक आहे. आणि त्या घटकाचे व्यामिश्र स्वरूप जाणण्याचे सामर्थ्य विवेकशक्तीच्या ठायी आहे ही श्रद्धा होय.

१९५० च्या दशकात मांडल्या गेलेल्या विचारांकडे लक्ष वेधत सर चार्ल्स नेमियर यांचे विचार आणि त्यांनी एका बाबतीत समाधान व्यक्त केले होते की वास्तव समस्या सोडविण्यासाठी व्यावहारिक मार्गाचा शोध घेतांना दोन्ही पक्षांना कार्यक्रम आणि ध्येये यांचा विसर पडतो आणि हे राष्ट्रीय प्रगल्भतेचे लक्षण असल्याचे त्यांचे म्हणणे होते.

अलिकडच्या लेखकांच्या लिखाणाचा वेध घेत ते राजकिय आदर्शवाद आणि प्रेषितावरील श्रध्दा यांचा धिक्कार करणाऱ्या लेखक पुराणमतवादावर श्रध्दा दाखवणारे अमेरीकन इतिहासकार , तर इंग्लंडमधील सावध पुराणमतवाद दृष्टीकोन नेमीवर यांची री ओढणारे प्रो.पॉपर यांनी संपूर्ण समाजाची पुनर्रचना करू पाहणाऱ्या योजना, याबद्दल बोलतात.

प्रो.पॉपर यांना एका बाबतीत धन्यवाद देतात ती म्हणजे ते विवेकशक्तीचे खंबीरपणे समर्थन करतात आणि वर्तमान किंवा भूतकाळातील विवेकविरोधी प्रवाहात सामील

होण्याचे नाकारतात. समाजाच्या खंडश: अभियांत्रिकी करणाची उपाययोजनेच्या तुलनेने विवेकाला मर्यादित स्थान देतात. कल्पनेच्या उचित कार्यवाहीसाठी त्यांनी सावधपणे जी उदाहरणे दिली आहेत घटनात्मक सुधारणा आणि संपत्तीचे अधिक समान वाटप करण्याचे धोरण विद्यमान समाजाच्या चौकटीतच करणे अभिप्रेत आहे.

मानवी जीवनातील प्रगती, मग ती विज्ञानातील असो की इतिहासातील असो समाजातील असो ती होण्याची कारणे अशी आहे, ज्यांनी ती घडवून आणली त्यांनी धीटपणे प्रचलित पध्दतीत तुकड्यातुकड्यांनी सुधारणा करण्याच्या धोरणाशी स्वत:ला जखडून घेण्याचे नाकारले, तसेच त्यांनी विवेकाची कास धरून प्रचलित कार्यपद्धतीला व तिच्या सुप्त गृहीत चौकटीला आव्हान देण्याचे धाडस दाखवले.

आग्लंभाषीय जगातील बुध्दीमंतांची आणि राजकीय विचारवंतांची विवेकावरील श्रध्दा ढासळत चाललेली बघून तसेच अखंड गतीमान असलेल्या जगाचे सर्वंकश भान सुटल्याचे बघून क्लेश होतात ही भावना करतात.